दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव • लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१८५ | गुरूवार दि.२४ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

थोडक्यात...

इलेक्शन कमिशनमधील अंतर्गत वाद धक्कादायक

बारामतीः केंद्रीय निवडणूक आयोगातील मतभेद चव्हाट्यावर आले असून, मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कारभाराबाबत त्यांच्या दोन सहका-यांनी कॅबिनेट सचिवांकडे थेट तक्रार केल्याचे समोर आले आहे. यासोबतच एसआयआर प्रक्रियेवरून करण्यात आलेल्या दाव्यांवरून विरोधकांनी रान पेटवले आहे. निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा का? यावर सुप्रिया सुळे म्हणाल्या, एका सशक्त लोकशाहीसाठी आजची बातमी अर्थातच धक्कादायक आहे म्हणजे मला विश्वासच बसत नाहीये की अरे बापरे आपल्यासारख्या देशामध्ये जिथे जगामधली सगळ्यात मोठी लोकशाही म्हणून भारताकडे बघितलं जातं महात्मा गांधींनी आणि असंख्य कुटुंबांनी एवढा मोठा लढा उभा केला. इलेक्शन कमिशनमध्ये आम्ही आणि उद्धवजींनी काय भोगलंय, हे मला काही काढायचं नाही. आज मला काही उणीदुणी काढत बसायची नाहीत. पण तो विषय त्याच्यामुळे आम्ही खूप भोगलं आणि त्याच इलेक्शन कमिशनने जे संविधानाच्या चौकटीत चालायला पाहिजे त्यातला अंतर्गत कलह हा ज्या पद्धतीने बाहेर आलाय हा धक्कादायक आहे आणि कुठल्याही सशक्त लोकशाहीला मोडून काढण्याच्या पापाची सुरुवात आहे. हे खूप चिंताजनक आहे. ही प्रक्रिय कुठल्याही सशक्त लोकशाहीसाठी अतिशय हानिकारक आहे.

सुट्टी असूनही रविवार बँका उघडणार

मुंबईः बँक ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. कर्मचारी संपाच्या पार्श्वभूमीवर रविवार, २७ सप्टेंबर २०२६ रोजी देशातील सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँका नियमितपणे सुरू राहणार आहेत. याबाबत केंद्रीय अर्थ मंत्रालयाने महत्त्वाची माहिती दिली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने २७ सप्टेंबर रोजी सर्व बँक शाखा, कार्यालये, संलग्न शाखा सुरू ठेवण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे रविवारी बँकिंग सेवा सुरु असणार आहेत. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सने २८ ते ३० सप्टेंबर २०२६ दरम्यान देशव्यापी तीन दिवसांचा संप पुकारण्याचा प्रस्ताव दिला आहे. त्यापूर्वी २६ आणि २७ सप्टेंबरला शनिवार-रविवारची सुट्टी असल्याने बँकिंग सेवा अनेक दिवस बंद होण्याची शक्यता होती. यामुळे ग्राहकांची गैरसोय होऊ नये आणि महत्त्वाच्या बँकिंग सेवा सुरळीत सुरू राहाव्यात, यासाठी सरकारने २७ सप्टेंबरला बँका सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

ठाकरे, शिंदेंची मानहानी खटल्यात निर्दोष मुक्तता

मुंबईः राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते वसंत डावखरे यांनी १७ वर्षांपूर्वी दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यातून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी खासदार आनंद परांजपे आणि दिवंगत माजी नगरसेवक राजेंद्र देवळेकर यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश संतोष आगे यांनी बुधवारी हा निकाल दिला. सबळ पुराव्याअभावी चौघांची मुक्तता करण्यात आली. २००९च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान शिवसेनेच्या नेत्यांनी वसंत डावखरे यांच्याशी संबंधित काही दृश्य-ध्वनी व ध्वनीमुद्रिका प्रचारसभेत दाखवल्याचा आरोप होता. त्या निवडणुकीत शिवसेनेकडून आनंद परांजपे, तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून वसंत डावखरे उमेदवार होते. परांजपे विजयी झाले. त्यानंतर डावखरे यांनी बदनामी केल्याचा आरोप करत ठाकरे, शिंदे, परांजपे आणि देवळेकर यांच्याविरोधात खटला दाखल केला होता. या प्रकरणात पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी, पोलीस अधिकारी, आयोजक आणि तपास अधिकारी अशा २० साक्षीदारांच्या साक्षी नोंदवण्यात आल्या.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.२३ सप्टेंबर २०२६
आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू: २८.५० क्विंटल

किमान	कमाल	सरासरी
२,६००	३,१७०	२,९४४

ज्वारी/हायब्रिड: ६३.५० क्विंटल

२,७९०	४,९००	४,१८०

मका/लोकल: ३२.०० क्विंटल

२,७२४	२,७२४	२,७२४

तूर : २.०० क्विंटल

९,२००	९,२००	९,२००

उडीद : ७.५० क्विंटल

८,६५१	८,७००	८,६८२

बाजरी: २२.०० क्विंटल

२,८११	२,९०१	२,८६३

मुग: १.०० क्विंटल

९,४९०	९,४९०	९,४९०

सोयाबीन: ३.५० क्विंटल

५,७८५	५,८४०	५,८१२

हरभरा: १०.५० क्विंटल

६,३९०	६,६९०	६,५४०

कर्जमुक्तीच्या चौथ्या यादीतील ७ लाख शेतकऱ्यांना लवकरच लाभ

जादा व्याज लावून खाती पाठवणाऱ्या बँकांना मुख्यमंत्र्यांचा दणका

लातूर आणि धाराशिव जिल्ह्यातील पीक-पाणी परिस्थितीची केली पाहणी

लातूर-धाराशिव । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिलेल्या सुमारे ६ ते ७ लाख शेतकऱ्यांना लवकरच कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. काही बँकांनी कर्ज खात्यांवर जादा व्याज आकारून ती खाती शासनाकडे पाठविल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधित बँकांना जादा व्याज काढून खाती पुन्हा पाठविण्याच्या कडक सूचना देण्यात आल्या असून, एका आठवड्यात ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिली.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी लातूर आणि धाराशिव जिल्ह्यातील पीक-पाणी परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी कर्जमाफीसह दुष्काळाच्या परिस्थितीबाबत माहिती दिली. फडणवीस म्हणाले की, कर्जमाफीच्या सुरुवातीच्या तीन याद्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. चौथ्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या जवळपास ६ ते ७ लाख शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांमध्ये काही बँकांनी जुने व्याज आणि अतिरिक्त व्याज लावून खाती पाठविली. ही बाब सरकारच्या निदर्शनास आली आहे. त्यामुळे संबंधित बँकांना अतिरिक्त व्याज हटवून कर्जखाती पुन्हा पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बँकांकडून दुरुस्त खाती प्राप्त होताच शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात येईल. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या आधार प्रमाणीकरणासाठी आतापर्यंत दोन याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. दुसऱ्या यादीत ३ लाख ५५ हजार ६१४ शेतकऱ्यांचा समावेश आहे. पहिल्या यादीतील आधार ▶▶ पान २ वर

दुष्काळाची अधिसूचना लवकरच...

दरम्यान, राज्यातील दुष्काळी परिस्थितीवरही सरकारचे लक्ष असून दुष्काळाची पहिली अधिसूचना लवकरच प्रसिद्ध केली जाईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. दुष्काळाशी संबंधित आवश्यक उपाययोजनांबाबत शासनाकडून कार्यवाही सुरू आहे. विविध भागांतील दुष्काळासंदर्भातील अहवाल शासनाला प्राप्त झाले असून, शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

निवडणूक आयोगात वाद?

विरोधकांकडून ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी

दिल्ली । वृत्तसंस्था

देशभरात मतदार यादीची (स्पेशल इन्टेन्सिव रिव्हिजन : एसआयआर) प्रक्रिया सुरू असताना निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरून नवा वाद निर्माण झाला आहे. वृत्तानुसार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी गेल्या १० महिन्यांत आयोगाच्या काही निर्णयांवर आणि आदेशांवर तब्बल १४ वेळा लेखी आक्षेप नोंदवले. यातील चार आक्षेप एकाच दिवशी नोंदवण्यात आल्याचे वृत्त आहे.



या आक्षेपांमध्ये नव्या मतदारांची नोंदणी, मतदारांची नावे वगळणे आणि पुन्हा समाविष्ट करणे, मतदार यादीच्या डेटाबेसची सुरक्षितता तसेच एसआयआर प्रक्रियेशी संबंधित निर्णयांचा समावेश असल्याचे समोर आले आहे. काही निर्णय आपल्याला माहिती न देता घेतले जात असल्याचा ▶▶ पान २ वर

हा तर देशद्रोह – राहुल गांधी

राहुल गांधी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द वर पोस्ट करत 'वोट चोरी' हा भारतीय जनतेविरोधातील अपराध असून, तो संविधानावर थेट हल्ला असल्याचा दावा केला. तसेच भाजप, आरएसएस आणि निवडणूक आयोगाने मिळून हे केल्याचा आरोप करत त्यांनी याला 'देशद्रोह' म्हटले आहे. या पोस्टसोबत राहुल गांधी यांनी एक व्हिडीओही शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये त्यांनी निवडणूक आयोग आणि अधिकाऱ्यांना इशारा देताना, तुम्ही जे करत आहात ते चुकीचे आहे. हा देशद्रोह आहे. वेळ येईल, आम्ही तुम्हाला पकडू. तुम्ही वाचणार नाही, असे म्हटले आहे. दरम्यान, काँग्रेसने आरोप केला की, तीन सदस्यांच्या निवडणूक आयोगात सध्या केवळ मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हेच निर्णय घेत आहेत.

राष्ट्रवादीच्या नेत्यांनी शेतांना भेट देऊन पंचनामा तयार करावा-सुनेत्रा पवार

पुणे । प्रतिनिधी



महाराष्ट्रातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना शेतकऱ्यांच्या शेतांना भेट देण्याचे कडक निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्रातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (एनसीपी) अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी बुधवारी पक्षाचे मंत्री, प्रभारी मंत्री, खासदार, आमदार, माजी आमदार आणि प्रमुख अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्या शेतांना वैयक्तिकरित्या भेट देऊन पिकांच्या नुकसानीचा आढावा घेण्याचे निर्देश दिले. पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना आवाहन केले की, नैसर्गिक आपत्तींच्या काळात शेतकरी असहाय्य राहणार नाहीत याची खात्री करावी. त्यांनी पक्षाच्या प्रतिनिधींना शेतकऱ्यांच्या समस्या वैयक्तिकरित्या समजून घेण्याचे, बाधित भागांना भेट देण्याचे ▶▶ पान २ वर

विद्यानंद बापट पुणे पदवीधरची निवडणूक लढवणार?

असीम सरोदेंच्या सूचक ट्विटने चर्चांना उधाण

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील ढोलवादन आणि डीजे विरोधात आवाज उठवत गणेश विसर्जन मिरवणुकांवर बंदी घालण्याची मागणी करणारे विद्यानंद बापट हे राजकारणाच्या मैदानात उतरणार असल्याची चर्चा सुरु झाली आहे. विद्यानंद बापट हे पुणे पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतील वाईल्ड



कार्ड एन्ट्री ठरु शकतात. कायदेतज्ज्ञ ॲडव्होकेट असीम सरोदे यांच्या सोशल मीडियावरील एका पोस्टमुळे या चर्चांना उधाण आले आहे.

असीम सरोदे यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, माझ्यासोबत उभ्या असलेल्या व्यक्तीचा आता खूप परिचय देण्याची आवश्यकता उरली नाही. ध्वनीप्रदूषणाच्या राक्षसा विरोधात निर्भयपणे

शिस्त पाळा ; प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा !

राज्य शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांनी बीडचा शिक्षण विभाग घेतला फैलावर



बीड । प्रतिनिधी

शिक्षण विभागातील विविध शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाचा वेग वाढवून शाळास्तरापासून जिल्हास्तरापर्यंतची सर्व कामे निर्धारित वेळेत आणि १०० टक्के पूर्ण करावीत, असे स्पष्ट निर्देश 'चला शाळेत जाऊ या' अभियानांतर्गत आयोजित आढावा बैठकीत देण्यात आले. बीड येथील के एस के महाविद्यालयात बुधवारी ही महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीला महाराष्ट्र राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी आणि छत्रपती संभाजीनगर विभागाचे शिक्षण उपसंचालक कैलास दातखील यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील, ▶▶ पान २ वर



महाराष्ट्रातील विधानसभेची निवडणूक रद्द करा-उद्धव ठाकरे

मुंबई । प्रतिनिधी

निवडणूक आयोगाबाबत मोठा गौप्यस्फोट समोर आला आहे. निवडणूक आयोगात एकवाक्यता नसल्याचे समोर आले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या काही निर्णयांवर दोन्ही निवडणूक आयुक्तांनी काही आक्षेप घेतले होते. ही बाब समोर येताच काँग्रेसने पत्रकार परिषद घेऊन दिल्ली आणि हरियाणातील विधानसभेच्या झालेल्या निवडणुका रद्द करा, अशी मागणी केली आहे. उद्धव ठाकरे यांनी सुद्धा पत्रकार परिषद घेऊन मुख्य निवडणूक आयुक्तांवर प्रश्नचिन्ह निर्माण केले.

''देशांतर्गत, पक्षांतर्गत लोकशाही कशी राबवली जाते की नाही हे बघणारा निवडणूक आयुक्त नेमणुकीद्वारे नेमला जातो. त्याची निवडणूक का होत नाही?. मग हा कोणाच्या मर्जीने नेमला जातो? कोण नेमतो याला? मर्जीने याची नेमणूक होत असेल तर त्यांच्या घरचं पाणी भरणार. तो पाणी भरताना इतकं पाणी भरतोय की त्यात देशाची लोकशाही बुडतेय'' असे उद्धव ठाकरे म्हणाले. ''मी निवडणूक आयोगाला धन्यवाद देतो. सुखबीर संधू आणि विवेक जोशी यांना, तुम्ही धाडस दाखवलं. आता तुमच्या लक्षात येत असेल, म्हणून मी विचारलं, तुम्ही सगळे चॅनलवाले पत्रकार परिषदा दाखवता का? चॅनलने त्या भयातून बाहेर येणं गरजेचं आहे. आता जनता रस्त्यावर उतरली तर मात्र काही सांगता येत नाही. तुम्ही लोकशाहीचे आधारस्तंभ आहात. लोकशाहीचा होत असलेला हा खून, पक्ष फोडणारी दरोडेखोरांची टोळी याचा पर्दाफाश जनतेसमोर आला पाहिजे'' असे उद्धव ठाकरे यांनी ▶▶ पान २ वर

भाजपात मोठे बदल; महाराष्ट्रातील तिघांकडे मोठी जबाबदारी

विनोद तावडे, मेधा कुलकर्णींकडे उत्तर प्रदेश तर राम माधवांकडे दोन राज्य

नवी दिल्ली । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी आगामी विधानसभा निवडणुकींच्या दृष्टीने तयारी सुरू केली आहे. भाजपने बुधवारी राज्य प्रभारी आणि सहप्रभारी यांची नियुक्ती केली आहे. यात स्मृती इराणी यांची हरयाणा- छत्तीसगडच्या प्रभारीपदी, विनोद तावडेंची उत्तर प्रदेश प्रभारीपदी, मेधा कुलकर्णींची उत्तर प्रदेशच्या सहप्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर भारती पवार यांच्याकडे गोवा प्रभारीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. पुढील वर्षी ३होणाऱ्या सहा पैकी तीन राज्यांची



जबाबदारी महाराष्ट्रातील भाजप नेत्यांकडे सोपवण्यात आली आहे.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी बुधवारी २८ राज्य आणि आठ केंद्रशासित प्रदेशांसाठी प्रभारी आणि सहप्रभारी नियुक्त केले. खासदार विनय सहस्रबुद्धे यांच्याकडे दिल्ली प्रभारीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. महाराष्ट्रासाठी वैजयंत जय पांडा यांची प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून अनेक वर्ष भाजपच्या आयटी सेलची जबाबदारी सांभाळणारे अमित मालवीय यांना महाराष्ट्राचे सहप्रभारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. तर सदानंदशेट तानावडे आणि कमलजीत सहरावत यांच्याकडे सहप्रभारीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. भारताच्या राजकारणात उत्तर प्रदेशचे महत्त्वाचे स्थान आहे. पुढील वर्षी उत्तर प्रदेशमध्ये विधानसभा निवडणुका होणार असून भाजपने या निवडणुकीची ▶▶ पान २ वर

भोंदूबाबा अशोक खरातच्या कोठडीत वाढ, पत्नी कल्पनाला सशर्त जामीन



नाशिक । प्रतिनिधी

लैंगिक अत्याचाराचा आरोप असलेले नाशिकचे रहिवासी भोंडुबाबा अशोक खरात यांच्या न्यायालयीन कोठडीत वाढ करण्यात आली आहे. या प्रकरणात एका विशेष न्यायालयाने त्यांच्या पत्नी कल्पना खरात यांना सशर्त जामीन मंजूर केला आहे. ▶▶ पान २ वर

अग्रलेख

गरबा भाड्याने! उत्सवाच्या नावाखाली नात्यांचाही बाजार मांडला जातोय का?

नवरात्र म्हणजे शक्तीची आराधना. गरबा म्हणजे भक्ती, उत्साह, सामूहिक आनंद आणि परंपरेचा उत्सव. पण सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या कथित 'ठशर्पी र ऋलीलर झरींपशी' जाहिरातीने या उत्सवाच्या झगमगाटामागे एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा केला आहे-आता गरब्यासाठीही जोडीदार भाड्याने मिळणार? आणि त्यासाठी चक्क सिल्व्हर, गोल्ड, प्लॅटिनम अशी पॅकेजेस? ही जाहिरात खरी आहे की केवळ सोशल मीडिया स्टंट, हा तपासाचा विषय आहे. परंतु जाहिरातीत करण्यात आलेले दावे जर प्रत्यक्ष सेवेशी संबंधित असतील, तर प्रश्न आणखी गंभीर होतो. कारण येथे केवळ नृत्याचा साथीदार उपलब्ध करून देण्याची बाब नाही; काही पॅकेजमध्ये वैयक्तिक स्वरूपाच्या सेवांचे उल्लेख असल्याचे वृत्त आहे. मग गरबा राहिला कुठे आणि 'सेवा' नेमकी कुठे सुरू झाली?

आज प्रत्येक गोष्टीचे पॅकेजिंग करण्याचा काळ आहे. शिक्षण पॅकेजमध्ये, पर्यटन पॅकेजमध्ये, मनोरंजन पॅकेजमध्ये आणि आता कदाचित नातेसंबंधही पॅकेजमध्ये! दोन तास गरबा, चार तास गरबा, दिवसभर गरबा; त्यावर सेल्फी, रील्स आणि कथित वैयक्तिक सेवा-उत्सवाचा आनंद विकायचा की मानवी सहवासालाही दरपत्रक लावायचे? बाजारपेठेला दोष देणे सोपे आहे. प्रौढ व्यक्तींना कायदेशीर आणि सुरक्षित पद्धतीने नृत्यसाथीची सेवा देण्यात स्वतःहून काही बेकायदेशीरता गृहीत धरता येणार नाही. पण सेवा कोणती, तिच्या अटी काय, ग्राहक कोण, सेवा देणाऱ्या व्यक्तींची पडताळणी कशी होते आणि जाहिरातीत केलेले दावे प्रत्यक्षात कितपत खरे आहेत-हे प्रश्न टाळता येणार नाहीत. विशेषतः महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न तर अधिक गंभीर आहे. सोशल मीडियावरील एका जाहिरातीवर विश्वास ठेवून एखादी महिला अनोळखी व्यक्तीशी संपर्क करते. आपली माहिती देते. पैसे भरते. कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचते. त्यानंतर तिच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची? इव्हेंट आयोजकाची? जाहिरातदाराची? सोशल मीडिया प्लॅटफॉर्मची? की शेवटी पीडित व्यक्तीचीच? जर ही सेवा खरोखर अस्तित्वात असेल तर आयोजकांची ओळख काय? त्यांच्याकडे नोंदणी आहे का? आर्थिक व्यवहार कोणत्या खात्यात होतात? ग्राहकांची वैयक्तिक माहिती कुठे साठवली जाते? सेवा देणाऱ्या व्यक्तींची पार्श्वभूमी तपासली जाते का? कार्यक्रमाच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था आहे का? अल्पवयीन व्यक्तींना प्रवेश किंवा संपर्काची शक्यता आहे का? आणि सर्वांत महत्त्वाचे-जाहिरातीतील आकर्षक पॅकेजच्या आड कोणता व्यवहार सुरू आहे?

मुंबईचे भाजप आमदार संजय उपाध्याय यांनी या जाहिरातीबाबत पोलिसांकडे तक्रार करून चौकशीची मागणी केली आहे. ही बाब तपासाच्या दृष्टीने पुढे जाणे आवश्यक आहे. मात्र तक्रार झाली म्हणून जाहिरातदार दोषी ठरला, असेही मानता येणार नाही. तपासाने तथ्य बाहेर यायला हवे. कारण सोशल मीडिया हा न्यायालय नाही आणि व्हायरल होणे म्हणजे सत्य सिद्ध होणे नव्हे. पण प्रशासनाची जबाबदारी येथेच संपत नाही. सोशल मीडियावर संशयास्पद जाहिरात व्हायरल झाल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा अशा डिजिटल जाहिरातींच्या माध्यमातून होणाऱ्या संभाव्य फसवणुकीवर आधीच नियंत्रण का नसावे? प्रत्येक वेळी एखादी जाहिरात लाखो लोकांपर्यंत पोहोचल्यानंतरच यंत्रणा जागी होणार का? आणखी एक प्रश्न 'संस्कृती'च्या नावाने निर्माण केला जात आहे. परंपरेच्या रक्षणाची भाषा करणे सोपे आहे; पण परंपरा वाचविण्याच्या नावाखाली प्रौढ व्यक्तींच्या कायदेशीर स्वातंत्र्यावर अनावश्यक निर्बंध लादणे हा उपाय नाही. गरबा बदलत आहे, संगीत बदलत आहे, आयोजन बदलत आहे आणि डिजिटल माध्यमांमुळे उत्सवाचे स्वरूपही बदलत आहे. बदलाला थांबविण्यापेक्षा बदल कायद्याच्या चौकटीत आहे की नाही, हे तपासणे महत्त्वाचे. मात्र उत्सवाच्या नावाखाली व्यक्तीच्या सुरक्षिततेशी खेळ होत असेल, फसवणूक होत असेल किंवा महिलांच्या सन्मानाला बाधा आणणारे व्यवहार चालत असतील, तर 'उत्सव आहे' म्हणून त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आज गरबा 'भाड्याने पार्टनर' देण्यापर्यंत पोहोचल्याची जाहिरात समोर आली आहे. उद्या उत्सवातील प्रत्येक भावनिक गरजेला व्यावसायिक पॅकेज मिळणार का? एकटेपणाला किंमत, सहवासाला किंमत, नात्यांना किंमत आणि शेवटी संस्कृतीलाही किंमत? सण बाजारपेठेत येणे ही एक गोष्ट; पण बाजारपेठेने सणाची भाषा, नाती आणि मर्यादा ठरवणे ही पूर्णपणे वेगळी गोष्ट आहे. म्हणूनच प्रश्न केवळ 'गरबा पार्टनर भाड्याने मिळतो का?' हा नाही. खरा प्रश्न आहे-उत्सवाच्या झगमगाटामागे कोणता बाजार उभा केला जातोय? त्यावर कोणाची नजर आहे? आणि नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी नेमकी कोणाची?

नवरात्रात देवीची आराधना केली जाते. स्त्रीशक्तीचा जयघोष केला जातो. त्याच काळात महिलांच्या सुरक्षिततेबाबत संशय निर्माण करणाऱ्या जाहिराती समाजासमोर येत असतील, तर हा विरोधाभास दुर्लक्षित करून चालणार नाही. गरब्याच्या तालावर पावले थिरकू द्या; पण विवेकाला तालबाह्य होऊ देऊ नका. उत्सव साजरा करा, बाजारपेठेला वाव द्या; पण कायद्याची, सुरक्षिततेची आणि मानवी प्रतिष्ठेची किंमत मोजून नव्हे. आणि जर ही जाहिरात खोटी असेल-तर ती कोणी केली, का केली आणि लाखो लोकांपर्यंत ती पोहोचेपर्यंत यंत्रणा झोपली कुठे होती, याचे उत्तरही तितक्याच स्पष्टपणे मिळाले पाहिजे. कारण खरी समस्या गरब्याला जोडीदार मिळण्याची नाही; खरी समस्या आहे-या जाहिरातीमागे नेमके कोणते 'नाते' जोडले जात आहे, नागरिकांचे की बाजाराचे.?

रुग्णालयाची बदनामी करण्याची धमकी देत ५० हजारांची मागणी; डॉक्टरची पोलिसांत तक्रार

जालना । प्रतिनिधी

अंबड-मंठा बायपास रोडजवळील संजीवनी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलच्या बदनामीची धमकी देत पैशांची मागणी केल्याचा आरोप करत डॉक्टरांनी जालना पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. याबाबत पत्रकार परिषद मध्ये माहिती देताना डॉक्टर बळीराम बागल म्हणाले की या सर्व घटनेची माहिती पोलीस अधीक्षक यांना मी दिली होती याप्रकरणी यांच्या सूचनावरून मी कदम जालना पोलीस स्टेशन मध्ये सर्व पुरावे सादर करून गुन्हा दाखल केला. अशी माहिती पत्रकार परिषद मध्ये डॉ. श्री बळीराम बागल यांनी दिली आहे.

तक्रारदार डॉ. बळीराम प्रभाकरराव बागल यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, शुभम केशव बडे यांच्यावर हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले होते. उपचाराचा खर्च आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर १५ सप्टेंबर रोजी तक्रारदारांच्या मोबाईलवर अनोळखी क्रमांकावरून संदेश आला. पुढील दिवशी सोशल मीडियावर हॉस्पिटलच्या उपचारासंदर्भात बदनामीकारक पोस्ट प्रसारित झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणात निकिता काळे, सचिन सर्वे यांच्यासह काही व्यक्तींनी हॉस्पिटलविरोधात तक्रार करण्याची तसेच सोशल मीडियावर बदनामी करण्याची धमकी देऊन पैशांची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, हॉस्पिटलचे एच.आर. मॅनेजर शैलेश जोशी यांनी सुरुवातीला १० हजार रुपये दिल्याचे नमूद आहे. त्यानंतर पुन्हा ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच हॉस्पिटलची बदनामी करणारे संदेश व पोस्ट सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आल्याचे तक्रारदारांनी पोलिसांना सांगितले. या प्रकरणी संबंधित व्यक्तींविरुद्ध पुरावे तपासून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी डॉ. बागल यांनी फिर्यादीत केली आहे. तक्रारीसोबत सोशल मीडियावरील संबंधित स्क्रीनशॉट तसेच रुग्णाच्या उपचारासंबंधी संमतीपत्र पोलिसांना सादर केल्याचेही नमूद आहे. याप्रकरणी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला.

गणेश विसर्जनासाठी वाहतूक मार्गात बदल पर्यायी मार्गांचा वापर करा -पोलीस अधीक्षक

जालना । प्रतिनिधी

गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जालना शहरात दि. २५ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन मिरवणूक पारंपरिक मार्गाने काढण्यात येणार आहे. या काळात मिरवणुकीमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये, रस्ता मोकळा राहावा तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी शहरातील वाहतुकीत तात्पुरते बदल करण्यात आले आहेत. याबाबत पोलिस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ च्या कलम ३६ अन्वये आदेश जारी केला आहे.



आदेशानुसार, छत्रपती शिवाजी महाराज पुतळाटांगा स्टँडसराफा बाजारपाणीवेससुभाष चौक या मार्गावरून जुन्या जालन्याकडे जाणारी वाहतूक छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, ओम हॉस्पिटल, मंगल बाजार, चमन बाजार, राजमहल टॉकीजजवळील पुलावरून ग्लोबल गुरुकुल शाळेजवळून बायपास रोडने अंबड चौफुली, नूतन वसाहत मार्गे वळविण्यात येणार आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज पुतळाबडीसडकसराफा बाजारजवाहर बाग चौकीरहेमान गंज मार्गे जुना मोंढा या मार्गावरील वाहतूक शिवाजी महाराज पुतळा, जिजामाता प्रवेशद्वार, जेईएस कॉलेज, बाबुराव काळे चौक, रहेमान गंज मार्गे वळविण्यात येणार आहे. नवीन जालनासदर बाजार परिसररहेमान गंजमुर्गी तलाव परिसरजवाहर बाग चौकी परिसरातील वाहतूक मामा चौक व सुभाष चौक मार्गे जुन्या जालन्याकडे जाण्यासाठी जुना मोंढा कमान, दीपक वाईन शॉप, बसस्थानक, लक्कड कोट, शिशटेकडी मार्गे वळविण्यात येणार आहे. बसस्थानकाकडून येणारी वाहतूक सुभाष चौक, पाणीवेस मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याकडे जाताना बसस्थानक, दीपक वाईन शॉप, जुना मोंढा कमान, मुरगी तलाव, बाबुराव काळे चौक, जेईएस कॉलेज, जिजामाता प्रवेशद्वार मार्गे वळविण्यात येणार आहे. रेल्वे स्टेशनकडून मंमादेवी मार्गे गांधी चमन व मंमादेवी मार्गे नवीन जालन्यात जाणारी वाहतूक नूतन वसाहत, अंबड चौफुली व मंठा चौफुली मार्गे वळविण्यात येणार आहे. याशिवाय छत्रपती संभाजीनगरकडून जालना मोतीबाग मार्गे अंबड, रेवगाव, घनसावंगी, मंठा, सिंदखेडराजाकडे जाणारी वाहतूक ग्रेडर टी पॉइंट, राजूर चौफुली, नवीन मोंढा, कन्हैया नगर मार्गे बायपास रोडने वळविण्यात येणार आहे. गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान नागरिकांनी पोलिस प्रशासनाने दिलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करून वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी सहकार्य करावे. वरील आदेश दि. २५ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ७ वाजेपासुन श्रीगणेश विसर्जन होईपर्यंत अंमलात राहिल असे आवाहन करण्यात आले आहे.

सरकार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे-रावसाहेब पाटील दानवे

जालना । प्रतिनिधी

मागील दीड महिन्यापासून बदनापूर तालुक्यासह जालना जिल्ह्यात तसेच मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागात पावसाने ओढ दिल्याने खरीप पिकांची परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे. नुकसान ग्रस्त शेतकऱ्याची पाहणी करता वेळी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचे डोळे पणावली. पावसाअभावी सोयाबीन, कापूस, तूर, मूग यांसह विविध खरीप पिकांवर मोठा परिणाम झाला असून जवळपास सर्व पिके वाळून गेली आहेत. त्यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. या गंभीर परिस्थितीची पाहणी करण्यासाठी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी बदनापूर तालुक्यातील नजीक पांगरी, केळीगव्हाण, राजेवाडी, दावलवाडी आदी गावांना भेट देऊन शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन प्रत्यक्ष पीक परिस्थितीची पाहणी केली.

यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न केले जातील. पावसाअभावी खरीप पिकांचे मोठे नुकसान बदनापूर तालुक्यातील अनेक भागांत पावसाचा दीर्घ खंड पडल्यामुळे जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. परिणामी सोयाबीन पिक पूर्णपणे वाळले आहे. कापूस, तूर आणि मूग या पिकांनाही पावसाच्या खंडाचा मोठा फटका बसला आहे. या पिकाची वाढ पूर्णपणे खुंटली आहे, कपाशीला दोन-दोन चार-चार बोंड आले आहेत, दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शेतातील पिकाच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, नुकसानग्रस्त क्षेत्राचे सर्वेक्षण करावे आणि पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या निकषांनुसार आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे. तसेच पीक विमा, दुष्काळी मदत आणि इतर



शासकीय योजनांचा लाभ तातडीने मिळावा, अशी शेतकऱ्यांनी रावसाहेब पाटील दानवे यांच्याकडे अपेक्षा व्यक्त केली. पावसाने ओढ दिल्याने यंदा खरीप पिकांची स्थिती नाजूक असून जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात मोठा पाऊस न झाल्याने शंभर टक्के पिकांचे नुकसान झाले आहे. यामुळे सरकार लवकरच शेतकऱ्यांना मदत देऊन दुष्काळात करण्यात येणाऱ्या उपाययोजना तात्काळ राबवेल असा विश्वास माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनी व्यक्त केला. शासन काय उपाय योजना करणार याची माहिती दिली. यावेळी काही शेतकऱ्यांना आश्रू अनावर झाल्याचे दिसून आले. पिण्याचे पाणी, हाताला रोजगार,जनावरांना चारा व शेतकऱ्यांना आर्थिक मदत या गोष्टींना प्राधान्य असून त्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. आता मोठा पाऊस पडला तरी खरिपाच्या पिकांना लाभ होणार नाही. मात्र पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी होऊ शकते. यावेळी खासदार कल्याण काळे यांनी बदनापूर येथे केलेल्या वक्तव्याचा संदर्भ देत दानवे यांनी प्रत्युत्तर दिले. ''आमचे सरकार शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी पुसणार नाही, तर शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत करण्यासाठी प्रयत्नशील आहे,'' असे ते म्हणाले. काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनी आमच्या सरकारने काय करावे हे सांगू नये त्यांनी काय केले हे प्रथम सांगावे त्यांच्या सरकारच्या काळात फक्त एक हेक्टरक्षेत्राला मदत मिळत. आमच्या सरकारने दोन हेक्टर क्षेत्राला मदत जाहीर केली आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे दोन वर्षे मुख्यमंत्री होते. एक अथवा दोन वेळेस ते मंत्रालयात गेले. त्यांनी निवडणूक आयोगाविरूद्ध बोलण्याऐवजी दुष्काळ, पाणीटंचाई, शेतकरी यावर बोलण्याची गरज आहे. उद्धव ठाकरेंचा कोणावरच विश्वास नसल्याची खरमरीत टीका दानवे यांनी केली. यावेळी भाजपा माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, वसंतराव जगताप, भगवान कदम, किशोर कदम, पद्माकर जऱ्हाड, कैलास तात्या मदन, विलासराव जऱ्हाड, प्रदीप साबळे, हरिभाऊ सुकासे, कल्याणराव काळे, विष्णू कोल्हे, जनाबापू चोरमारे, परमेश्वर शिंदे, संजय घुगे, रुद्रदेव, भगवानराव मदन, शिवाजी वेताळ, गजानन काटकर, अमोल चव्हाण, गजानन मोरे, राजाभाऊ निंबाळकर, आप्पा पाटील कदम, हरिभाऊ कबाडे, नवनाथ वाघ, अनिल कोळकर, विकास वाघ, ॲड. बालाजी वाघ, श्रीराम वाघ, संतोष कदम, संजय घुशिंगे, रामसिंग घुशिंगे, आदिनाथ फटाले, तात्याराव म्हात्रे, भरत कान्हेरे, परमेश्वर कबाडे, ज्ञानदेव मदन, किशोर कदम, किशोर जाधव, गणेश जगताप, परसराम जोगदंड, अमोल जगताप, संदीप चंद यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

पान १ वरून...

जादा व्याज लावून खाती

प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या १२ लाख ५८ हजार शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांवर एकूण १० हजार ११४ कोटी ९० लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. यामध्ये ७ ऑगस्ट रोजी ६ लाख २२ हजार शेतकऱ्यांना ५ हजार २८ कोटी ६० लाख रुपये, तर २४ ऑगस्ट रोजी ६ लाख ३६ हजार शेतकऱ्यांना ५ हजार ८६ कोटी ३० लाख रुपये वितरित करण्यात आले. कर्जमुक्ती योजनेसाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असून, पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी शासनाकडून प्रक्रिया वेगाने राबविण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राष्ट्रवादीच्या नेत्यांनी शेतांना भेट देऊन

आणि वेळेवर मदत पुरवण्यासाठी प्रशासनासोबत काम करण्याचे आवाहन केले. जेव्हा शेतकरी कठीण परिस्थितीतून जात असतात, तेव्हा त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हे आपले कर्तव्य आहे. त्यांच्या शेतांना भेट द्या, त्यांच्या समस्या ऐका, त्यांना धीर द्या आणि त्यांना आवश्यक सरकारी मदत देण्यासाठी शक्य ते सर्व करा. या कठीण काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा आहे, असा विश्वास शेतकऱ्यांमध्ये निर्माण करण्याचे आवाहनही त्यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना आणि प्रतिनिधींना केले.

निवडणूक आयोगात

मुद्दाही दोन्ही आयुक्तांनी उपस्थित केल्याचे वृत्त आहे. 'द इंडियन एक्स्प्रेस'च्या तपासणीनुसार, संधू आणि जोशी यांनी आयोगाच्या कामकाजातील काही निर्णयांवर औपचारिकरीत्या आक्षेप नोंदवले. मतदार यादीत नव्या मतदारांची नोंदणी, विद्यमान मतदारांची नावे हटवणे आणि हटवलेली नावे पुन्हा बहाल करण्याच्या प्रक्रियेबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केले. संधू यांनी आयोगाने दोन आयुक्तांच्या लेखी सल्ल्याच्या विरोधात निर्णय घेतल्याचे नमूद केले आणि तो निर्णय 'अनधिकृत आणि बेकायदा' असल्याचा दावा केल्याचे वृत्त आहे. नवीन मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या फॉर्म-६ मध्ये करण्यात आलेल्या बदलावरही प्रश्न उपस्थित करण्यात आला. जोशी यांनी मे महिन्यात या बदलाबाबत आक्षेप घेतल्याचे आणि संधू यांनीही त्याला समर्थन दिल्याचे वृत्त आहे. यानंतर ऑगस्टमध्ये संधू यांनी हा बदल 'अनधिकृत आणि बेकायदा' असल्याचे नमूद करून तो तातडीने हटवण्याची मागणी केल्याचे म्हटले गेले आहे. मतदार यादी व्यवस्थापनासाठी वापरल्या जाणाऱ्या डिजिटल प्रणालीतील नियंत्रणाबाबतही दोन्ही आयुक्तांनी चिंता व्यक्त केली. मतदार यादीचा डेटाबेस हळूहळू दिल्लीतील केंद्रीय पातळीवर केंद्रीकृत होत असल्याचा मुद्दा जोशी यांनी उपस्थित केला. स्थानिक पातळीवरील निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांना मतदार यादीत आवश्यक बदल करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत आहे का, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. दोन्ही आयुक्तांनी या प्रणालीचे ऑडिट करण्याची गरज असल्याचे सांगितल्याचे वृत्त आहे. गोव्यातील एका प्रकरणाचाही या वादात उल्लेख करण्यात आला आहे. एसआयआर प्रक्रियेत काही मतदारांच्या नावांबाबत त्रुटी होत्या. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी कागदपत्रांची तपासणी करून ९७ मतदार पात्र असल्याचे मान्य केले. मात्र, सॉफ्टवेअरमध्ये पूर्वी हटवलेली नावे पुन्हा समाविष्ट करण्याची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे हे ९७ मतदार अंतिम मतदार यादीत समाविष्ट होऊ शकले नसल्याचे तपासणीत नमूद करण्यात आले आहे. पश्चिम बंगालमध्ये मतदारांची नावे वगळण्याशी संबंधित प्रकरणांवरूनही प्रश्न उपस्थित करण्यात आले. काही मतदारांची नावे पुन्हा समाविष्ट करण्याच्या निर्णयाविरोधात निवडणूक आयोगाच्या वतीने अपील दाखल करण्यात आल्याचे समोर आले. या अपिलांसाठी अधिकृत परवानगी कोणी दिली आणि ती प्रक्रिया नेमकी कोणी राबवली, याबाबत संधू यांनी प्रश्न उपस्थित केल्याचे वृत्त आहे. या प्रक्रियेची माहिती आपल्याला किंवा जोशी यांना देण्यात आली नव्हती, असा दावा त्यांच्या आक्षेपात करण्यात आल्याचे सांगितले जाते. दरम्यान, या वृत्तानंतर निवडणूक आयोगाने अंतर्गत मतभेद असल्याचा दावा नाकारला आहे. एसआयआरसह आयोगाने घेतलेले सर्व निर्णय तिन्ही निवडणूक आयुक्तांच्या मंजुरीने आणि एकमताने घेण्यात आले आहेत, असे सांगण्यात आले आहे. संधू आणि जोशी यांनी काही मुद्द्यांवर आक्षेप घेतले होते आणि त्यांचा विचार करण्यात आला. मात्र, कोणत्याही निवडणूक आयुक्तांनी औपचारिक असहमती नोंदवलेली नाही, असे आयोगाच्या सूत्रांचे म्हणणे आहे.

शिस्त पाळा ; प्रलंबित कामे

शिक्षणाधिकारी (योजना) डॉ. किरण कुंवर, 'डाएट'चे प्राचार्य मुरकुटे, सातव साहेब आणि जिल्हा संगणक प्रोग्रामर सुरेंद्र रणदिवे उपस्थित होते. बैठकीमध्ये जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व डाटा एन्ट्री ऑपरेटर यांच्या उपस्थितीत शाळानिहाय कामकाजाचा सूक्ष्म आढावा घेण्यात आला. यामध्ये शैक्षणिक माहितीचे संकलन, विविध डिजिटल पोर्टलवरील नोंदी आणि प्रलंबित प्रशासकीय बाबींवर सविस्तर चर्चा झाली. आपापल्या कार्यक्षेत्रातील कामांना सर्वोच्च प्राधान्य देऊन एकही काम अपूर्ण राहणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना मान्यवरांनी दिल्या. सप्टेंबर महिन्यापासून प्रलंबित असलेल्या सर्व कामांचा निपटारा तातडीने करण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. कामांची गती वाढवण्यासाठी गटशिक्षणाधिकारी ते केंद्रप्रमुख स्तरापर्यंत दररोज पाठपुरावा करावा, अशा सूचना देण्यात आल्या. जोपर्यंत प्रलंबित कामे १०० टक्के पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत यंत्रणेने गांभीर्याने आणि प्राधान्याने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. शाळांची प्रगती, माहितीची अचूकता आणि वेळेचे पालन ही संपूर्ण शिक्षण विभागाची सामूहिक जबाबदारी असून, सर्वांनी समन्वयाने काम करून जिल्ह्याची शैक्षणिक कामगिरी उंचावण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

महाराष्ट्रातील विधानसभेची

म्हटले. मी चॅनलना विचारतोय तुमच्यात एकमत करा. लोकशाही वाचवा. आम्ही लढतच आहोत. आम्ही विरोधी पक्ष जनतेचे प्रतिनिधी आहोत. जनता आता नुसती 'मन की बात' ऐकणार नाही'' असे उद्धव ठाकरे म्हणाले. ''आपल्या विधानसभा निवडणुका झाल्या, त्यावेळी बेकायदेशीर सरकार होते. निवडणूक आयुक्तांनी भांडं फोडलेलं आहे. कसा मनमानी कारभार चालत होता. पश्चिम बंगालमध्ये ९० लाख मतदार वगळले. महाराष्ट्रात ४५ लाख मतदार घुसवले. ४० लाखांवर आक्षेप घेतला होता. मी, राज आम्ही मविआने मोर्चा काढला असे उद्धव ठाकरे म्हणाले. इथल्या निवडणूक आयुक्तांना विचारलं, ते बोलतात आमच्याकडे पॉवर नाही. मग पॉवर कोणाकडे आहे? असा सवाल उद्धव ठाकरेंनी विचारला. ''म्होरक्या कोण आहे? ज्ञानेशकुमारला तात्काळ तुरुंगात टाकले पाहिजे, मग त्याच्या म्होरक्याला तुरुंगात टाकून या सगळ्या प्रक्रियेचा पुनर्विचार झाला पाहिजे. महाराष्ट्र, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालच्या निवडणुका रद्द करून इथल्या निवडणुका बॅलेट पेपरवर झाल्या पाहिजेत. विरोधी पक्षात मतभेद असले तरी बॅलेट पेपरच्या मुद्दावर एकत्र आलं पाहिजे'' अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली.

विद्यानंद बापट पुणे पदवीधरची

उभा असणारा 'विद्यानंद बापट'. अनेकांच्या मनातील दुःख बोलणारा आणि उत्सवांचे विकृत स्वरूप, त्यातील ओंगळवाणेपणा चव्हाट्यावर आणणारा हिरो ठरला आहे. तर विद्याविभूषित, सुसंकृत, विनम्र, अभ्यासू, प्रत्येक सामाजिक प्रश्नांची जाणीव असणारा विद्यानंद बापट आज जणू प्रत्येक घरातील आपुलकीचा सदस्य झालेला आहे. भाषेचा स्तर बिघडू न देता, विषयाला धरून बोलणारा आणि समाजाला वैश्विक बनविण्याची क्षमता असणाऱ्या विद्यानंद बापट ने पदवीधर मतदारांमधून निवडणूक लढवावी का? तुम्हाला काय वाटते?, असा प्रश्न असीम सरोदे यांनी पुणेकरांना विचारला आहे. असीम सरोदे यांच्या या पोस्टवर पुणेकर आणि राज्यभरातील नागरिक भरभरुन प्रतिक्रिया देत आहेत. विद्यानंद बापट यांनी खरोखरच पुणे पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लढवायला हवी. ते १०० टक्के निवडून येतील. बापट खरंच भारी माणूस,ते जेव्हा बोलतात तेव्हा असं वाटतं आपल्या मनातलं बोलत आहेत. साधा माणूस, भारी माणूस लोकप्रतिनिधी म्हणून सभागृहात जायला हवं ही जानभावना आहे, अशा कमेंट येताना दिसत आहेत. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ३ पदवीधर आणि २ शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीची अधिकृत घोषणा झाली आहे. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार असून, २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाणार आहे.

भोंदूबाबा अशोक खरातच्या कोठडीत

न्यायालयाने अशोक खरातच्या न्यायालयीन कोठडीत आणखी वाढ केली आहे. या हाय-प्रोफाईल प्रकरणाची पुढील सुनावणी आता ३० सप्टेंबर २०२६ रोजी होणार आहे. अशोक खरातवर ४७ कोटींहून अधिक रुपयांचा आर्थिक घोटाळा, महिलांचे लैंगिक शोषण आणि मोठ्या प्रमाणावरील फसवणुकीसह गंभीर आरोप आहेत. अंमलबारी संचालनालय (ईडी) आणि नाशिक पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. या प्रकरणातील आरोपी अशोक खरात यांच्या पत्नी कल्पना खरात यांना विशेष न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. न्यायालयाने कल्पना खरात यांचा जामीन अर्ज स्वीकारला आणि त्यांना १ लाख रुपयांच्या वैयक्तिक जामीनपत्रावर सशर्त जामीन मंजूर केला. न्यायालयाने कल्पना खरात यांना जामीन मंजूर केला आणि कडक निर्देश दिले. न्यायालयाच्या अटींनुसार, कल्पना खरात पूर्वपरवानगीशिवाय देश सोडून जाऊ शकत नाहीत. त्यांच्या पासपोर्ट आणि प्रवासाच्या कागदपत्रांवरही निर्बंध घालण्यात आले आहेत. भोंदूबाबा अशोक खरात यांच्यावर अंधश्रद्धा, चमत्कार आणि धार्मिक विधींचे आमिष दाखवून शेकडो लोकांना फसवून त्यांची ४७ कोटींहून अधिक रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. तपास यंत्रणांच्या मते, या पैशांचा वापर बेनामी मालमत्ता खरेदी करण्यासाठी आणि वैयक्तिक चैनीसाठी करण्यात आला. इतकेच नाही, तर त्यांच्या आश्रमात आलेल्या अनेक पीडित महिलांचे लैंगिक शोषण केल्याचाही या बाबावर आरोप आहे. अंमलबारी संचालनालयाने (ईडी) अशोक खरात यांच्या विरोधात दाखल केलेल्या ३,००० पानांच्या आरोपपत्रावर सुनावणी झाली. खरात नाशिक रोड तुरुंगातून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर झाले. अशोक खरात यांच्या विरोधात नाशिक, सिन्नर, शिर्डी आणि राहाटा येथे एकूण १७ गुन्हे दाखल आहेत. दैवी शक्ती आणि भविष्यवाणीच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण आणि आर्थिक फसवणूक केल्याचा खरात यांच्यावर आरोप आहे.

भाजपात मोठे बदल; महाराष्ट्रातील

तयारीदेखील सुरू केली आहे. भाजपच्या यादीत उत्तर प्रदेशला महत्त्व दिल्याचे दिसते. विनोद तावडे हे उत्तर प्रदेशचे प्रभारी असतील. याशिवाय महाराष्ट्राच्या खासदार मेधा कुलकर्णी, जगदीश पटेल, प्रदीप वर्मा आणि अनंत ओझा यांना उत्तर प्रदेशच्या सहप्रभारीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. बिहारमध्ये भाजपची महायुती सत्तेत आहे. या राज्यातही प्रभारी- सहप्रभारींची भक्कम फळी नियुक्त करण्यात आली आहे. अनुभवी नेते हरीष द्विवेदी हे भाजपचे प्रभारी असतील तर संगीता यादव, रोहन गुप्ता हे सहप्रभारी असतील. पुढील वर्षी पंजाब, उत्तराखंड, गोवा, मणिपूर, हिमाचल प्रदेश आणि गुजरात या राज्यांमध्ये निवडणु

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. २४ सप्टेंबर २०२६
३

थोडक्यात

शालेय क्रीडा स्पर्धेत संस्कार इंग्लिश स्कूल चौसाळा चे यश

चौसाळा । प्रतिनिधी

श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल बीड या ठिकाणी सन २०२६-२०२७ च्या बीड तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा पार पडल्या.या स्पर्धेत संस्कार इंग्लिश स्कूल चौसाळा या शाळेतील



विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व स्पर्धेत यश मिळवले मैदानी स्पर्धेमध्ये अंडर १४ या वयोगटात गोळा फेक या प्रकारात कु. साक्षी भक्तराज झोडगे हिने द्वितीय क्रमांक मिळवला,तसेच १०० मीटर धावणे या स्पर्धेत दूर्वा बाळासाहेब हंगे हिने द्वितीय क्रमांक पटकावला व लांब उडी या प्रकारात श्रद्धा हनुमंत सर्वज्ञ हिने द्वितीय क्रमांक पटकावला, अंडर १७ वर्ष वयोगटात चि. अपूर्व तुकाराम माळकर याने २०० मी. धावणे या गटात द्वितीय क्रमांक मिळवला या सर्व खेळाडूंची जिल्हा स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली तसेच ४ह्न १०० रिले मध्ये प्रज्वल जाधव,स्वराज गायकवाड, समर्थ जगताप, प्रणव गायकवाड यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. शाळेने प्रथमच या स्पर्धेत भाग घेतला होता सरावाला अत्यंत कमी वेळ असतानाही मुलांनी मिळवलेले यश हे कौतुकास्पद आहे. मुलांच्या या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका मीनाक्षी माळकर, संस्थेचे अध्यक्ष तुकाराम माळकर,उपाध्यक्ष लक्ष्मण तोडकर, कोषाध्यक्ष विकास तोडकर यांनी सर्व यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले.

पांडुरंग रूख्मिणीच्या मनमोहक मुर्तीची प्राणप्रतिष्ठा

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील सहयोगनगर येथील श्रीगजानन महाराज मंदिरात श्रीगजाननविजय पांडुरंग व देवी रुख्मिणी यांच्या मनमोहक मूर्तींची प्राणप्रतिष्ठा बुधवार, दि. २३ सप्टेंबर रोजी भक्तिमय



धार्मिक विधींनी सहयोग नगरातील श्रीगजानन महाराज मंदिरात भक्तिमय वातावरण

वातावरणात संपन्न झाली. भाद्रपद शुक्लपक्ष द्वादशी, श्रवण नक्षत्र, सुकर्मा योग तसेच वामन अवतार जयंतीचा योग साधून हा धार्मिक सोहळा आयोजित करण्यात आला होता.

संतश्रेष्ठ श्रीगजानन महाराज यांचे आराध्य दैवत असलेल्या पांडुरंगाच्या मूर्तींची मंदिराच्या गाभाऱ्यात विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आल्याने भाविकांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची गर्दी झाली होती. विविध धार्मिक विधी, मंत्रोच्चार आणि पूजाविधीने मंदिर परिसर भक्तिमय झाला होता.वामन अवतार जयंतीच्या दिवशी श्रीकृष्णाचे प्रकटस्वरूप मानल्या जाणाऱ्या श्रीपांडुरंगाची मूर्ती मंदिरात स्थानापन्न होणे हा विशेष धार्मिक योग असल्याचे गजानन सांस्कृतिक मंडळाच्या वतीने सांगण्यात आले. मुहूर्तावर प्राणप्रतिष्ठा विधी पार पडल्यानंतर भाविकांनी पांडुरंग-रुख्मिणीचे दर्शन घेतले.प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मोठया संख्येने भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रम भक्तिभाव आणि उत्साहात पार पडला.

महसूलच्या मनमानी कारभाराविरोधात
सय्यद सलीमबापूंचे दुसऱ्यांदा आमरण उपोषण

माजलगाव । प्रतिनिधी

मनुर शिवारातील सर्व्हे नं.२५ च्या जमिनीचा वाद पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून,महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीविरोधात आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीमबापू यांनी मंगळवारी दि. २२ रोजी तहसील कार्यालयासमोर आमरण बेमुदत उपोषण सुरू केले आहे.या प्रकरणातील फेरफार, खरेदीखते,पीटीआर तसेच महसूल अभिलेखांची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीची चौकशी करावी अशी मागणी करत न्याय न मिळाल्यास तिसरे उपोषण विभागीय कार्यालय संभाजीनगर येथे करण्याचा इशारा दिला आहे.

मनुर येथील सर्व्हे नं.२५ मधील ३ हेक्टर १६ आर ही जमीन हमाल-मापाडींच्या हक्काशी संबंधित आहे.मयत भुजाबा महादू खांडेकर हे हमाल-मापाडींचे अध्यक्ष असल्याने त्यांच्या नावावर ही जमीन खरेदी करण्यात आली होती, त्यानंतर सदर जमिनीबाबत कथितरीत्या फेरफार व खरेदी-विक्रीचे व्यवहार झाले आहेत.जमिनीवर एन.ए. लेआऊट करून सुमारे २०० ते २२५ प्लॉट हमालांना खरेदीखताद्वारे देण्यात आले आहेत.मात्र,अनेक हमालांच्या ग्रामपंचायत रेकॉर्डमध्ये नोंदी होऊन पीटीआर मिळाले असतानाही ७/१२ उताऱ्यावर मालकी



मनुरच्या सर्व्हे नं.२५ ची शासकीय मोजणी करून हद्दखुणा निश्चित करत फेरफार,खरेदीखतांची चौकशीची मागणी

हक्काच्या रकान्यात त्यांची नावे नाहीत.मयत भुजाबा खांडेकर यांच्या निधनानंतर त्यांच्या वारसांची नावे ७/१२ उताऱ्यावर नेमक्या कोणत्या कागदपत्रांच्या आणि कोणत्या कायदेशीर प्रक्रियेच्या आधारे दाखल करण्यात आली,सर्व्हे नं.२५ संदर्भातील फेरफार कोणत्या कागदपत्रांच्या आधारे करण्यात आले,याची चौकशी करून संपूर्ण फेरफार नोंदी तपासाव्यात,

यासाठी ग्रामसेवक,मनुर यांच्याकडून या जमिनीबाबत देण्यात आलेल्या पीटीआरची संपूर्ण माहिती मागवावी, तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीचे अहवाल तपासावेत,या प्रकरणात तहसीलदार,मंडळ अधिकारी आणि तलाठी यांच्या कार्यपद्धती आर्थिक व्यवहार झाले असल्याचा संशय आहे.या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून दोष आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी,अशी मागणी त्यांनी केली आहे.दरम्यान तहसील कार्यालयासमोर सुरू केलेले हे सय्यद सलीमबापू यांचे दुसरे उपोषण आहे.यापूर्वीही मनुर शिवारात आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले होते.यावेळी न्याय न मिळाल्यास तिसरे ऊपोषण विभागीय आयुक्त कार्यालय संभाजीनगर येथे करण्यात येईल असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.दरम्यान, माजलगाव महसूल प्रशासनाकडून सामान्य नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष होत असुन तहसीलदार संतोष रुईकर यांचे मंडळ अधिकारी,तलाठी,ग्रामसेवक व इतर कर्मचाऱ्यांवर नियंत्रण नसल्याने गैरप्रकारांना प्रोत्साहन मिळत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला असून,या आरोपांचीही चौकशी करण्याची मागणी केली आहे.

आष्टीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या आरोग्य योजनांचा लाभ
आ.सुरेश धस यांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना उपचारांचा आधार

आष्टी । प्रतिनिधी

आर्थिक परिस्थितीमुळे गरजू रुग्णांच्या उपचारात अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी शासनाच्या आरोग्यविषयक योजनांचा लाभ पात्र रुग्णांपर्यंत पोहोचविण्यासाठी आष्टी विधानसभा मतदारसंघात पाठपुरावा सुरू आहे. मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्या आरोग्यविषयक उपक्रमांतून तसेच आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून आयुष्यमान भारत योजना, मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिर आणि मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना उपचार व आर्थिक मदतीचा आधार मिळत आहे.

आष्टी तालुक्यातील मेहकरी येथील नानाभाऊ रामभाऊ गव्हाणे उपचारासाठी अहिल्यानगर येथील नोबेल हॉस्पिटलमध्ये दाखल झाले होते. त्यांना एकाच वेळी दोन आजारांवर उपचाराची आवश्यकता होती. आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत उपचार मिळविताना अडचणी येत

आयुष्यमान भारतअंतर्गत दोन रुग्णांच्या उपचारांचा मार्ग मोकळा; महाआरोग्य शिबिरातून गुडघ्याची मोफत शस्त्रक्रिया, मुख्यमंत्री सहायता निधीतून १.१० लाखांची मदत





असल्याची तसेच खउण बेड उपलब्ध नसल्याची माहिती मिळाल्यानंतर आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून संबंधित हॉस्पिटल प्रशासनाशी संपर्क साधून आवश्यक पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर गव्हाणे यांच्या पुढील उपचारांची व्यवस्था आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत मोफत करण्याचा मार्ग मोकळा झाला.

कडा येथील शंकर नागरे यांच्या बाबतीतही आयुष्यमान भारत कार्डाचे व्हेरिफिकेशन प्रलंबित असल्याने उपचारांमध्ये अडचण निर्माण झाली होती. ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत कार्डाच्या मंजुरीसाठी पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर त्यांच्या कार्डाला मंजुरी मिळाली असून, पुढील उपचार योजनेअंतर्गत मोफत होणार आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे आयोजित मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिरातून तपासणी, उपचार आणि पुढील वैद्यकीय प्रक्रियेसाठी मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून भाऊसाहेब महाराज यांच्या कुटुंबातील रुग्णाची गुडघ्याच्या शस्त्रक्रियेसाठी निवड झाली. गेल्या दोन वर्षांपासून गुडघ्याच्या त्रासामुळे संबंधित रुग्ण त्रस्त होते. मात्र शस्त्रक्रियेसाठी लागणारा मोठा खर्च परवडणारा नसल्याने उपचार घेणे कठीण झाले होते. महाआरोग्य शिबिरातील प्रक्रियेनंतर संबंधित रुग्णावर सैनिक हॉस्पिटलमध्ये गुडघ्याची शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात आली. त्यामुळे कुटुंबाला उपचारासाठी कोणताही खर्च करावा लागला नाही. उपचारानंतर भाऊसाहेब महाराज यांनी व्हिडिओद्वारे व्यक्त केलेली कृतज्ञता ही या मदतीचा मानवी पैलू अधोरेखित करणारी ठरली.

पान ६ वरुन...

बीड तालुक्यात तब्बल

संबंधित व्यवसायांची पाहणी करण्याची प्रक्रिया पुढेही सुरू राहण्याची शक्यता आहे . प्रशासनाकडून संबंधित ठिकाणी नियमांची पूर्तता , आवश्यक कागदपत्रे आणि शासनाच्या निर्देशांचे पालन याबाबत तपासणी केली जाणार आहे . त्यामुळे संबंधित व्यावसायिकांनी प्रशासनाला सहकार्य करून आपल्या व्यवसायाशी संबंधित सर्व बाबी नियमानुसार ठेवाव्यात , असे आवाहन करण्यात येत आहे. बीड मंडळातील ६ आणि पाली मंडळातील ९ अशा एकूण १५ क्रशरवर करण्यात आलेली सील कारवाई ही बीड तालुक्यातील महसूल प्रशासनाच्या धडक मोहिमेतील महत्त्वाची कारवाई ठरली आहे . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या नेतृत्वाखाली क्षेत्रीय महसूल यंत्रणेने घेतलेल्या या भूमिकेमुळे गौण खनिजाशी संबंधित व्यवसायांमध्ये नियमपालनाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे .

७ गावठी हातभट्टी दारू

संजय जाधव, रामदास एकनाथ पवार, विठ्ठल हिरालाल राठोड आणि ४ महिलांसह एकूण ११ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दुसऱ्या एका कारवाईत, ताकडगाव येथे काही व्यक्ती पत्त्यांचा जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरून २३ सप्टेंबरच्या मध्यरात्री ००:१० वाजता पोलिसांनी छापा टाकला. या छाप्यात दत्ता काशिनाथ जंगले, मोहन प्रकाश गव्हाणे, श्रीहरी अभिमान यादव आणि तानाजी लक्ष्मण जगदाळे (सर्व रा. ताकडगाव, ता. गेवराई) हे चार जण जुगार खेळताना रंगेहात पकडले गेले. त्यांच्याकडून मोटारसायकली आणि रोख रकमेसह ३,२१,७०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. दोन्ही कारवाया मिळून पोलिसांनी एकूण ४,१८,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल जितेंद्र ओव्हाळ करत आहेत. सदर यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत गेवराईचे पोलीस निरीक्षक किशोर पवार, पोलीस उपनिरीक्षक अमोल शिंगणे, पोलीस कर्मचारी नितीन नवले, महेंद्र ओव्हाळ, विनोद कुटे, जितेंद्र ओव्हाळ, गोरक्ष डोके, संदीप कांबळे, महादेव कदम, राजेंद्र सांगळे तसेच महिला पोलीस कर्मचारी शिवकन्या निंगुळे, रेणुका बहिरवाळ, कांता शेळके आणि धुमाळ यांनी सक्रिय सहभाग घेतला. गेवराई पोलिसांनी अवैध धंद्यांविरुद्ध उगारलेल्या या बडग्यामुळे तालुक्यातील अवैध धंदे चालकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.

राज्यात त्वरित कोरडा दुष्काळ

६. शेतकरी व शेतमजूर यांच्या मुलांची शैक्षणिक फी संपूर्ण माफ करुन त्यांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी शासनाने स्वीकारावी.

वरील मागण्या तात्काळ मान्य न केल्यास अ. भा. छावा संघटनेच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, याची शासनाने गंभीर नोंद घ्यावी असा इशारा अ. भा. छावाचे चे बीड जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा रोमन यांनी दिला आहे. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना अशोक अण्णा रोमन यांच्यासोबत उपजिल्हाध्यक्ष गणेश भाऊ घोडके, विद्यार्थी जिल्हाप्रमुख पप्पू लांडे पाटील, अल्पसंख्याक आघाडी जिल्हाध्यक्ष सिद्दीकी फारुकी, तालुका अध्यक्ष ईश्वर नवले, बीड जिल्हा संपर्कप्रमुख दत्ता काशीद, बहिरवाडी सर्कल प्रमुख नाना महाराज लांडे पाटील, चौसाळा सर्कल प्रमुख अंकुश खडके पाटील, तसेच गिरीश करवा, अविनाश पवार यांच्यासह अ. भा. छावाचे चे बीड जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते

बीड पुणे जलद रेल्वे सेवेला

बोर्डाने सुधारित थांबा जाहीर करून बीड पुणे एक्सप्रेस रेल्वे सेवेला रायमोहा येथे थांबा द्यावा व अधिकाधिक ग्रामीण जनतेला या रेल्वे सेवेचा लाभ मिळून देण्यात यावा. सद्यस्थितीत या रेल्वे सेवेला थांबा नसल्यामुळे अनेक प्रवाशांना बीडला या सेवेचा लाभ घेण्यासाठी जावा लागत आहे. ही गैरसोय टाळण्यासाठी रायमोहा येथे थांबा देण्यात यावा. अशी आग्रहाची मागणी उपसभापती जालिंदर सानप यांनी केली आहे.

विलास इचके यांची

५६ सेकंदांत यशस्वीरीत्या पूर्ण केले. या कामगिरीसाठी त्यांना आयोजकांकडून समारोप प्रमाणपत्रही देण्यात आले. विशेष म्हणजे, शौर्य मॅरेथॉनमध्ये इचके यांनी स्वतःची वेळ सुधारत आतापर्यंतची सर्वात कमी वेळ नोंदवली. अवघ्या काही दिवसांच्या अंतरात दोन आव्हानात्मक मॅरेथॉन पूर्ण करत त्यांनी धावण्यातील सातत्य, मेहनत आणि जिद्द दाखवून दिली आहे. छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित शौर्य मॅरेथॉन ही केवळ धावण्याची स्पर्धा नसून भारतीय सैन्य आणि नागरिकांना एकत्र आणणारा विशेष उपक्रम म्हणून ओळख निर्माण करत आहे. ए नगर सायकलिंग क्लबचे गौरव फिरोदिया यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येत असून, महाराष्ट्रातील विविध भागांतील धावपटू यात सहभागी होत आहेत.

मॅरेथॉनमध्ये सहभागी धावपटूंना सैन्य परिसरात धावण्याची संधी, पौष्टिक पदार्थांची भेटपिशवी, अल्पोपहार आणि धावण्यानंतर स्नायूंना आराम मिळण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामुळे नवीन तसेच अनुभवी धावपटूंसाठी ही मॅरेथॉन आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.विलास इचके यांच्या या कामगिरीचे माजलगाव ग्रामीण पोलिसांनी केलेले कौतुक हे त्यांच्या मेहनतीला मिळालेली प्रोत्साहनाची दाद मानली जात आहे. धावण्याची आवड, नियमित सराव आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर इचके यांनी स्वतःची कामगिरी सुधारत नेली असून, त्यांच्या या यशाचे क्रीडाप्रेमी आणि नागरिकांकडूनही कौतुक होत आहे.

राजस्थान माध्यमिक विद्यालयाचा

प्रतीक राजेभाऊ जाधव, समर्थ रामनाथ काळे, रितेश संतोष क्यातामवार, वेदांत विनायक पांडित, सार्थक शिवाजी जोगडे, विनायक संदीप झगडे, विश्वराज गणेश चव्हाण, गौरव भागवत कदम, सोहम सचिन राठोड, अश्विन नितीन कोकाटे, आरुष विलास कुंभार, कार्तिक श्रीहरी झगडे, सर्वेश अनिल कुलकर्णी व पृथ्वीराज अशोक शेंडगे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बजाज, सचिव रामानंदजी लड्ढा व कोषाध्यक्ष रमेशचंद्र कासट तसेच विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

नैतिक अधिष्ठान असलेला समाज निर्माण केल्याशिवाय स्वातंत्र्याला कसलाच अर्थ नाही - डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शालेय विद्यार्थ्यांवर नैतिक मूल्य असलेले विचार संस्कार दिले तरच नैतिक अधिष्ठान असलेला समाज निर्माण होईल आणि हा नैतिक अधिष्ठान असलेला समाज नैतिक मूल्य असलेल्या राष्ट्राची उभारणी करू शकेल आणि हे नैतिक मूल्य जपणारे राष्ट्र हे महासत्ता बनेल त्यामुळे नैतिक अधिष्ठान असलेली समाज रचना राष्ट्रासाठी खूप गरजेचे आहे त्याशिवाय मिळालेल्या स्वातंत्र्याला कसलाच अर्थ प्राप्त होणार नाही अशी प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

येथील स्वामी विवेकानंद विद्यालयात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी विचारमंचावर क्षितिज बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी तसेच सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ अखिलेश अंजान यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते सर्व महापुरूषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. पुढे बोलताना डॉ.इंगोले यांनी विद्यार्थी हा सभोवतालचे वातावरण तसेच आपल्या सभोवताली असणाऱ्या व्यक्तींचे वागणे, बोलणे हे निरीक्षणाने शिकत असतो. त्यानुसार त्याची व्यक्तिमत्व घडत असते. विद्यार्थ्यांच्या सभोवताली संस्कृत व्यक्ती असेल योग्य आचरण करणारे वातावरण असेल योग्य संस्कृती असेल तर त्या विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्व हे संस्कारी सर्जनशील बनते. त्यामुळे नैतिक मूल्य असणारे विचार जर विद्यार्थ्यांच्या बाल मनात त पेरले गेले तर नैतिक अधिष्ठान असलेली समाज रचना निर्माण होईल ही नैतिक अधिष्ठान असलेली समाज रचना भारताला नैतिक राष्ट्र बनवेल आणि नैतिक दृष्ट्या संपन्न असलेला देश हा महासत्ता बनत असतो. त्यामुळे या वयात योग्य संस्कार मिळणे गरजेचे आहे हे डॉ.राजेश इंगोले यांनी निक्षून सांगितले. पालकांनीही केवळ



आपला पाल्य शाळेत सोडला म्हणजे आपले कर्तव्य संपले असे मानण्याची कारण नाही आपल्या घरी ही आपल्याला आपल्या पाल्यांवर योग्य संस्कार कसे देता येतील याकडे लक्ष दिले पाहिजे. आपल्या पाल्याला आपण एखादी गोष्ट सांगत असताना आपण त्या गोष्टीचे काटेकोरपणे पालन करत आहोत का नाही हे तपासणी गरजेचे असते कारण मुलांना असे करा असे करू नका हे सांगण्यापेक्षा जर आपण कृतीतून ती गोष्ट प्रत्यक्षात उतरवली तर त्याचा परिणाम जास्त असतो. मुलांच्या जडणघडणीमध्ये पालकांसोबतच शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. आई ही मुलाची पहिली शाळा असते आणि शाळा ही मुलांची दुसरी आई असते या वाक्यात या दोन्ही घटकांचे महत्त्व अधोरेखित केले आहे असेही डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. तर यावेळी डॉ.इंगोले यांनी विविध उदाहरणे देत चांगल्या सवयी व वाईट सवयी याचे स्पष्टीकरण केले. आपल्या पाल्यांना मोबाईल, टी.व्ही तसेच अन्य वाईट सवयींपासून दूर कसे ठेवावे याची माहिती डॉ.इंगोले यांनी उपस्थित पालकांना शिक्षकांना व विद्यार्थ्यांना दिली. पालकांनी आपल्या मुलांचे सुप्त गुण ओळखून त्याला त्या क्षेत्रात त्याचे ध्येय कशी साध्य करता येईल यासाठी काही मार्गदर्शक सूचना केल्या. यावेळी उपस्थित पालकांनी डॉ.राजेश इंगोले यांना मुलांच्या अभ्यास विषयक तसेच वर्तणूक विषयक समस्या याबाबत प्रश्न विचारून त्यांचे शंका निरसन करून घेतले. यावेळी अखिलेश अंजान यांनी मुलांनी निरोगी कसे राहावे याकरिता सखोल मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी मुलांच्या अभ्यासाबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये विकास घडवून आणण्यासाठी संस्थेतर्फे विविध उपक्रम राबविले जातात त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अमुलाग्र बदल होतो असे सांगितले. मुलांना ध्येयाकडे नेण्यासाठी संस्थेचे सर्व शिक्षक अहोरात्र प्रयत्न करतात ही संस्थेच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे असे सांगत विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये सकारात्मक बदल घडून आणण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कार सादर करत आपल्या कला सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आश्विनी गिरी यांनी केले तर आभार अंकिता कुलकर्णी यांनी मानले.

जाहिर प्रगटण

मा. श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १४५४/२०२६

(मार्फत विधिज्ञ:- ॲड एन.एन.शिंदे)

अर्जदार :- १. कौराबाई भ्र.श्रीमंत गाडे, वय ६५ वर्षे धंदा घरकाम, रा. बकरवाडी, बीड ता.जि.बीड २. आशा भ्र.अंकुश मूळूक, वय ४५ वर्षे धंदा घरकाम, रा. कान्होबाचीवाडी, बीड ता.जि.बीड ३. कोमल भ्र. हरी निर्धार, वय ३६ वर्षे धंदा घरकाम, रा. वायभटवाडी, बीड ता.जि.बीड ४. वैशाली भ्र. दादासाहेब गाडे, वय ३२ वर्षे धंदा घरकाम रा. बकरवाडी, ता. जि.बीड , ५. रोशन पि. दादासाहेब गाडे, वय १४ वर्षे धंदा शिक्षण, रा. बकरवाडी, ता. जि.बीड ६. अनन्या पि. दादासाहेब गाडे, वय - १२ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. बकरवाडी, ता. जि.बीड अर्जदार क्र.५ व ६ अज्ञान, अ.पाक. आई अर्जदार क्र. ४

विरुध्द निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत नामे श्रीमंत पि. दादाराव गाडे हे दिनांक २८/०७/२०२३ रोजी बकरवाडी, बीड ता. जि.बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ व ३ ह्या मयताच्या विवाहित मुली असून अर्जदार क्र.४ ही मयताची सुन तर अर्जदार क्र.५ व ६ हे नातु व नात आहेत. अर्जदाराचे आई, वडील यापूर्वीच मयत झालेले आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक: २१/०९/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख: ९/१०/२०२६.

आदेशावरुन,
स्वाक्षरीत / -
अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

माजलगावात इतिहासाचा जागर; शाही शस्त्र प्रदर्शनाला ६,०११ विद्यार्थ्यांची भेट!
शाही शस्त्र प्रदर्शनातून मराठवाडा मुक्ती संग्रामातील क्रांतिकारकांच्या शौर्यगाथेला उजाळा

माजलगाव । प्रतिनिधी

लोकनेते स्व. सुंदररावजी सोळंके यांच्या ९९व्या जयंतीनिमित्त लोकनेते सुंदररावजी सोळंके महाविद्यालय, माजलगाव येथे दि. २१ व २२ सप्टेंबर रोजी 'क्रांतिकारकांच्या शौर्यगाथेचे प्रदर्शन', 'क्रांतिकारकांच्या कुटुंबीयांचा सन्मान सोहळा' आणि 'शिवकालीन शाही शस्त्र प्रदर्शन' आयोजित करण्यात आले होते. या ऐतिहासिक उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून दोन दिवसात एकूण ६,०११ विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट दिली. तसेच माजलगाव, धारूर आणि वडवणी तालुक्यातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रतिसाद दिला.

हैदराबाद मुक्ती संग्रामात माजलगाव, धारूर व वडवणी तालुक्यातील ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांनी दिलेल्या योगदानाची



माहिती ऐतिहासिक दस्तऐवज, दुर्मिळ छायाचित्रे आणि संदर्भांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आली. यामुळे क्रांतिकारकांचा संघर्ष, त्याग आणि शौर्य जाणून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. या प्रदर्शनात तलवार, भाला, ढाल, कट्यार यांसह शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन हे विशेष आकर्षण ठरले.

यावेळी क्रांतिकारकांच्या कुटुंबीयांचा प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.या संपूर्ण कार्यक्रमाची संकल्पना माननीय वीरेंद्र प्रकाशदादा सोळंके यांची असून या ऐतिहासिक उपक्रमाबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.हा उपक्रम इतिहास संशोधक रवींद्र भाऊसाहेब जगदाळे यांच्या संशोधनावर आधारित साकारण्यात आला असून, या संशोधनावर आधारित पुस्तकही लवकरच प्रकाशित होणार आहे. प्रदर्शन पाहण्यासाठी आलेल्या सर्व ६,०११ विद्यार्थ्यांसाठी नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. आ. प्रकाशदादा सोळंके होते, तर उद्घाटक म्हणून राधाकृष्ण रामकृष्ण खटावकर उपस्थित होते. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून धैर्यशील काका सोळंके ,मंगलाताई सोळंके, उज्वलाताई सोळंके, बाबुरावजी पोटभरे, दयानंद स्वामी, जयदत्त नरवडे, कल्याणराव आबुज, वीरेंद्र प्रकाश सोळंके जयसिंग भैय्या सोळंके, ऐश्वर्याताई सोळंके, यांची उपस्थिती होती.स्थानिक इतिहासाचे दस्तऐवजीकरण करून तो पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना, लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी पतसंस्था, रत्नसुंदर अर्बन को-ऑप सोसायटी, सिंदफणा पब्लिक स्कूल, जिजामाता फिजिओथेरपी कॉलेज अँड नर्सिंग कॉलेज माजलगाव, माजलगाव मध्यवर्ती ग्राहक संस्था, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, कानिफनाथ माध्यमिक विद्यालय मोहखेड आदी संस्थांच्या आयोजक समितीने अहोरात्र परिश्रम घेतले.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
गुरूवार दि.२४ सप्टेंबर २०२६
४

महाराष्ट्र दुष्काळाच्या विळख्यात!

कमी पावसामुळे २० जिल्ह्यांमध्ये संकट अधिक गडद

पुणे / प्रतिनिधी

कमी पावसामुळे महाराष्ट्रातील २० जिल्ह्यांमध्ये दुष्काळ अधिक गडद झाला आहे. मराठवाड्यातील पिके नष्ट झाली असून, पाणी आणि चाऱ्याच्या तीव्र टंचाईमुळे शेतकऱ्यांवर स्थलांतराचा धोका निर्माण झाला आहे.

महाराष्ट्रावर यावर्षीही दुष्काळाचे संकट आहे. राज्यातील ३६ पैकी २० जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा खूपच कमी पाऊस झाल्यामुळे अनेक भागांतील उभी पिके दुष्काळाच्या गर्तेत सापडली आहे. अनेक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांसमोर चिंतेचे वातावरण आहे. सर्वात गंभीर चित्र मराठवाड्यातून समोर येत आहे. २० सप्टेंबरपर्यंत, या भागातील आठ जिल्ह्यांमध्ये पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा केवळ ६० ते ६५ टक्के होते आणि जलाशयांमधील पाणीसाठा सुमारे ५० टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. दीर्घकाळच्या



दुष्काळामुळे सोयाबीन, कापूस, मका, तूर आणि मूग यांसारख्या पिकांवर परिणाम झाला आहे. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मते, अनेक भागांतील उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. महाराष्ट्राचे परिवहन मंत्री आणि धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी शेतकऱ्यांची भेट घेतली आणि पिकांची अवस्था पाहून चिंता व्यक्त केली. अनिश्चित हवामानामुळे सर्वांची चिंता वाढली आहे. तज्ञ आणि सरकारी यंत्रणा एल निनोसारख्या हवामान परिस्थितीच्या संभाव्य परिणामांवर सतत लक्ष ठेवून आहे. केंद्र सरकारने, महाराष्ट्रसह कृषी क्षेत्रावर एल निनोच्या संभाव्य परिणामावर लक्ष ठेवण्यासाठी हवामान आणि कृषी संघटनांशी समन्वय साधल्याची माहिती दिली आहे. तसेच शासनाने बाधित भागांमध्ये तात्काळ मदत, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि पीक नुकसानीचे मूल्यांकन करण्याचे आदेश दिले आहे. अधिकृत नुकसान मूल्यांकन प्रक्रिया ५ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे, परंतु राज्य सरकारने त्यापूर्वीच बाधित शेतकऱ्यांना मदत देण्याचे निर्देश दिले आहे.

पावसाळ्यात शेळ्यांचे व्यवस्थापन; टळेल आर्थिक नुकसान!



राज्यासह देशभरात अनेक शेतकरी हे शेळीपालन करतात. शेळीपालन व्यवस्थापनात सर्वांत जास्त काळजी ही गोठ्यात असणारी आर्द्रता कमी करण्यासाठी घ्यावी लागते. शेळ्यांना आर्द्रता सहन होत नाही, त्यामुळे त्यांना श्वसनसंस्थेचे रोग होण्याची दाट शक्यता असते. पावसाळ्यात आद्रतेचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे पावसाळ्यात शेळ्यांच्या व्यवस्थापनाते बदल करणे गरजेचे आहे. ज्यामुळे शेळीपालनातील आर्थिक नुकसान कमी करण्यास मदत होते.

जंतुनाशक औषधे द्यावीत :शेतकऱ्यांना पावसाळी शेळ्यांच्या व्यवस्थापनाबाबत माहिती असणे गरजेचे असते. यासाठी शेळीपालन व्यवसायात असणारी जागरूकता महत्त्वाची असते. शेळीच्या शरीरावर कोणत्याही प्रकारचा ताण वाढणार नाही, याची काळजी घ्यावी लागते. कळपातील सर्व शेळ्यांना जंतुनाशक औषधे द्यावीत. त्यामुळे कळप जंतमुक्त राहू शकतात. अेशावेळी शेळ्यांच्या अंगावर गोचीड होतात. त्यामुळे शेळ्यांना रोग होतात गोचीड शेळ्यांच्या शरीरातील रक्त शोषतात. त्यामुळे शेळ्या अशक्त होतात. अंगावर खाज सुटते, त्यामुळे शेळ्या बैचेन होतात, खाणे बंद करतात, हालचाल मंदावते यावर उपाय म्हणून शेळ्यांच्या अंगावर गोचीड प्रतिबंधक औषध लावावे किंवा गोठा धुऊन घ्यावा. ज्यामुळे शेळ्यांना होणाऱ्या आजारांपासून वाचवण्यास मदत होणार आहे.

आर्द्रता कमी ठेवण्यासाठी करा 'हे' उपाय : शेळ्यांना आर्द्रता अजिबात सहन होत नाही, त्या उष्णता सहन करू शकतात. गोठ्यातील आद्रता कमी ठेवण्यासाठी गोठ्यात रात्रीच्या वेळी शेगडी लावावी अथवा ६० वॉटचा विजेचा बल्ब रात्रभर लावून ठेवावा. गोठ्यातील मलमूत्र रोजच्या रोज साफ करून गोठा कोरडा ठेवावा गोठ्यातील जमीन जर ओली असेल तर शेळ्यांच्या पायाच्या खुरामध्ये ओलसर पणा राहून पायाला फोड येतात, यामुळे शेळ्या लंगडतात, ताप येतो, चारा कमी खाते अशक्त होतात. पावसाळ्याच्या दिवसात शेळ्यांना बाहेर सोडू नये.

पावसात जास्त वेळ शेळी भिजली की न्यूमोनियासारखा आजार होतो. यामुळे शेळी शिंकते, नाकातून चिकट पांढरा पिवळसर द्रव वाहतो, ताप येतो, धाप लागते. कोवळ्या चाऱ्यामध्ये तंतुमय पदार्थ कमी असतात, जास्त प्रमाणात हा चारा खाल्यामुळे शेळ्यांना अपचन होते. पोटफुगी, हगवणीसारखे आजार होतात. पोटफुगी होऊ नये यासाठी गोडे तेल आणि खाण्याचा सोडा पाजला तर पोटफुगी कमी होते.

कमी कालावधीत चांगले उत्पन्न देणारे पीक; कांदेपात लागवड

कांदेपात लागवड करणे अतिशय सोपे आणि कमी कालावधीत चांगले उत्पन्न देणारे पीक आहे. भाजीपाल्यासाठी आणि औषधी गुणधर्मांसाठी कांदेपाताला बाजारात नेहमीच चांगली मागणी असते.

हवामान आणि जमीन : हवामान: थंड आणि कोरडे हवामान या पिकासाठी उत्तम मानले जाते. मात्र, योग्य काळजी घेतल्यास हे पीक वर्षभरात कधीही घेता येते. जमीन: मध्यम ते भारी, उत्तम निचरा होणारी आणि सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध असलेली जमीन (कि६.० ते ७.०) योग्य ठरते.

पूर्वमशागत आणि वाफे तयार करणे : जमीन २-३ वेळा उभ्या-आडव्या नांगरणीने भुसभुशीत करून घ्यावी.शेवटच्या नांगरणीवेळी जमिनीत चांगले कुजलेले शेणखत (१०-१२ टन प्रति एकर) मिसळावे.लागवडीसाठी २ मीटर बाय ३ मीटर आकाराचे सपाट वाफे किंवा गादीवाफे तयार करावेत.

लागवडीच्या पद्धती : कांदेपाताची लागवड प्रामुख्याने दोन पद्धतींनी केली जाते. कांद्यांच्या रोपांद्वारे

बियाण्यापासून (कांदा बी/काळा तीळ) रोपवाटी तयार करून २० ते २५ दिवसांची रोपे पुनर्लागवड केली जातात. अंतर: दोन ओळींत १५ सेमी आणि दोन रोपांत ७-१० सेमी अंतर ठेवावे. छोट्या आकाराचे कांदे (तुकडे/गुंटी कांदा) थेट जमिनीत लावून कमी वेळेत कांदेपात मिळवता येते. अंतर: दोन कांद्यांमध्ये १०-१२ सेमी अंतर ठेवावे.

पाणी आणि खत व्यवस्थापन : लागवड केल्यानंतर लगेच हलके पाणी द्यावे. जमिनीच्या प्रकारानुसार आणि ऋतूनुसार ५ ते ७ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. काढणीच्या ५-७ दिवस आधी पाणी देणे थांबवावे.

खत व्यवस्थापन : कांदेपात हे पाल्याचे पीक असल्याने नत्राची गरज जास्त असते. लागवडीवेळी नत्र, स्फुरद आणि पालाश ५०:५०:५० किलो प्रति एकर द्यावे. लागवडीनंतर २० ते २५ दिवसांनी: २५ किलो नत्र (युरिया) प्रति एकर द्यावे.

तण नियंत्रण आणि आंतरमशागत : लागवडीनंतर १५ ते २० दिवसांनी पहिली खुरपणी करून तण काढून टाकावे. रोपांच्या मुळांशी मातीची हलकी भर द्यावी, ज्यामुळे कांद्याचा भाग पांढरा आणि मऊ राहण्यास मदत होते.

रोग आणि कीड नियंत्रण : कीड: प्रामुख्याने थ्रिप्सचा प्रादुर्भाव होतो. यासाठी कडुनिंबाचे तेल किंवा योग्य कीटकनाशकाची फवारणी करावी. रोग: तांब किंवा करपा. यासाठी बुरशीनाशकाचा वापर करावा.

काढणी आणि उत्पन्न : काढणीचा वेळ: लागवडीनंतर ४५ ते ६० दिवसांत कांदेपात काढणीस तयार होते. पद्धत: कांदेपात मुळासकट उपटून काढावी. त्यानंतर मुळांवरील माती धुवून स्वच्छ करावी आणि लहान-लहान जुड्या बांधून बाजारात विकावी. उत्पन्न: योग्य व्यवस्थापन केल्यास प्रति एकर ४० ते ६० क्विंटल कांदेपाताचे उत्पादन मिळते.



रब्बी सूर्यफूल लागवड तंत्रज्ञान

दिवसेंदिवस खाद्यतेलाची मागणी वाढत आहे. जागतिक पातळीवर सोयाबीन, मोहरी, भुईमूग या पिकानंतर सूर्यफूल हे चौथ्या क्रमांकाचे तेलबिया पिक आहे. या पिकाची लागवड खरीप तसेच रब्बी हंगमातही केली जाते. आपल्या देशात कर्नाटक, महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश ही प्रमुख सूर्यफूल उत्पादक राज्ये आहेत. महाराष्ट्रातील बरेच शेतकरी या पिकाच्या लागवडीकडे वळत आहेत.

सूर्यफूल लागवडीसाठी पूर्वमशागत व लागवडीचा हंगाम : पेरणीआधी जमिनीची खोल नांगरट करून कुळवाच्या आडव्या-उभ्या पाळ्या द्याव्यात. कोरडवाहू सूर्यफुलाची पेरणी दोन चाड्याच्या पाभरीने करावी. बियाणे ५ सें.मी. पेक्षा जास्त खोल पेरू नये. बागायती सूर्यफुलाची लागवड सरी-वरंब्यावर टोकन पद्धतीने करावी. मध्यम ते खोल जमिनीत अंतर ४५ बाय ३० सें.मी. तर भारी जमिनीत ६० बाय ३० सें.मी. ठेवावे. रब्बी हंगामात कोरडवाहू सूर्यफुलाची पेरणी १५ ऑक्टोबर पूर्वी करावी. तसेच बागायती सूर्यफुलाची पेरणी नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत करावी. सूर्यफूल लागवडीसाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. आम्लयुक्त व पाणथळ जमिनीत हे पीक घेऊ नये.

बीजप्रक्रिया व पिकाचे वाण : पेरणीसाठी सुधारित बियाणांचे वाण ८ ते १० कि.ग्रॅ. तर संकरित बियाणे ५ ते ६ कि.ग्रॅ. प्रति हेक्टरी वापरावे. मर रोगाच्या प्रतिबंधासाठी प्रतिकिलो बियाणास २ ते २.५ ग्रॅम थायरमची बीजप्रक्रिया करावी.



एस.एस. ५६ : कमी कालावधीत येणारे हे वाण असून अवर्षणग्रस्त भागात या वाणाची लागवड करावी. हे वाण ८० ते ८५ दिवसांत तयार होते. या वाणापासून सरासरी प्रति हेक्टरी ९ ते १० क्विंटल उत्पादन मिळते. मॉडर्न : हे वाण उशिरा पेरणीसाठी योग्य असून पिकाची उंची कमी असते. सरासरी प्रतिहेक्टरी ७ ते ८ क्विंटल इतके उत्पादन मिळते. भानू : हे सूर्यफुलाचे वाण कोणत्याही हंगामात घेता येते. हे वाण ८५ ते ९० दिवसांत तयार होते. प्रतिहेक्टरी १२ ते १३ क्विंटल उत्पादन मिळते. के.बी.एस.एच. १ : या वाणामध्ये तेलाचे प्रमाण व उत्पादनक्षमता अधिक आहे. ८५ ते ९० दिवसांत तयार होते. १२ ते १४ क्विंटल प्रतिहेक्टरी उत्पादन मिळते. एल.एस.एच-३५ : अधिक उत्पादनक्षमता, केवडा रोगास प्रतिकारक हे वाण आहे. ९० ते ९५ दिवसात तयार होते. प्रति हेक्टरी १८ ते २० क्विंटल उत्पादन मिळते. एल.एस.एफ.एच १७१ : या वाणाची लागवड कोरडवाहू तसेच बागायतीसाठी करता येते. सूर्यफुलाची आंतरपीक म्हणून लागवड करायची असल्यास तूर आणि भुईमूग या पिकामध्ये करावी.

खत व्यवस्थापन : जमिनीची पूर्वमशागत करताना लागवडीपूर्वी प्रतिहेक्टरी २.५ टन शेणखत टाकावे. कोरडवाहू पिकासाठी माती परीक्षणानुसार हेक्टरी ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद व २५ किलो पालाश हे खत वेळी दोन चाड्याच्या पाभरीने पेरणीच्या वेळी द्यावे. बागायती पिकासाठी ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद, ३० किलो पालाश द्यावे. यापैकी पेरणीच्या वेळी ३० किलो द्यावे. व पेरणीनंतर १ महिन्याने उर्वरित ३० किलो नत्र द्यावे.मशागत व पाणी व्यवस्थापन : पेरणीनंतर १५ दिवसांनी सूर्यफुलाची विरळणी करावी. दोन रोपांतील अंतर ३० सें.मी. ठेवावे. आवश्यकतेनुसार एक ते दोन खुरपण्या कराव्या. पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी एक आणि ३५ ते ४० दिवसांनी एक अशा दोन कोळपण्या कराव्यात. पिकाची रोपावस्था, फुलकळी, फुलोरा व दाणे भरताना अशा वाढीच्या अवस्थांमध्ये पिकाला पाणी द्यावे.कृत्रिम परागीभवन : पिकामध्ये दाणे भरण्यासाठी फुलाचे परागीभवन होणे आवश्यक असते. कृत्रिम परागीभवन करण्यासाठी हाताच्या पंजाला तलम कापड गुंडाळून सकाळी ६ ते ११ या वेळेत दर दिवसाआड तीन ते चार वेळा पिकावरून हळूवार हात फिरवावा. मधमाश्यांच्या चार ते पाच पेट्या एक हेक्टर पिकात ठेवाव्यात.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१६४१ : साली सहा हजार करोड पेक्षा जास्त सोन्या चांदीने भरलेला रॉयल मर्चंट जहाज इंग्लंडच्या दक्षिणी पश्चिमी समुद्री भागात बुडाला.
१८०३ : दुसरे इंग्रज-मराठा युद्ध: ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि भारतातील मराठा साम्राज्य यांच्यातील अश्तेची लढाई.
१८४६ : अर्बेन ली व्हेरिअर व त्याच्या २ सहकार्यांनी नेपच्यून ग्रहाचा शोध लावला. गणिती आकडेमोड करुन शोध लागलेला हा पहिला ग्रह आहे.
१८७३ : महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.
१८८४ : महात्मा फुलेंचे सहकारी रावबहादूर नारायण लोखंडे यांनी बॉबे मिल हँड्स असोसिएशन ही गिरणी कामगार संघटना स्थापन केली.
१८८९ : साली विडियो गेम बनविणारी अमेरिकन विश्व प्रसिद्ध कंपनी निनट्याडो ची स्थापना करण्यात आली.
१९०५ : आधी एकत्र असलेल्या नॉर्वे व स्वीडन यांनी 'कार्लस्टॅड' कराराद्वारे अलग होण्याचा निर्णय घेतला.
१९०८ : कॅनडातील 'युनिव्हर्सिटी ऑफ अल्बर्टा' ची स्थापना
१९३२ : हेझाझ आणि नेजडचे राज्य यांना सौदी अरेबियाचे राज्य नाव देण्यात आले.
१९८३ : 'सेंट किट्स आणि नेव्हिस'चा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९९२ : भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस इंद्रजित गुप्ता ''उत्कृष्ट संसदपटू'साठीचा ''गोविंद वल्लभ पंत पुरस्कार' पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांच्या हस्ते प्रदान.
२००२ : 'मोझिला फायरफॉक्स' या ब्राउजरची पहिली आवृत्ती प्रकाशित करण्यात आली.
२००३ : भारतीय वंशाच्या मीरा नायर यांची आशिया अमेरिकी साहित्य पुरस्कारासाठी निवड. त्यांच्या ''व्हीडिओ : स्टोरीज' या पुस्तकात स्थलांतराबाबतच्या अनुभवांचे कथन करण्यात आले आहे.
२००४ : योकोहामा (जपान) येथील मैदानी स्पर्धेत भारताच्या अंजू जॉर्जने रशियाची ऑलिंपिक विजेती तात्याना लेबेदेवाचा पराभव करून सुवर्णपदक पटकावले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२१५ : कुबलाई खान मंगोल सम्राट (मृत्यू: १८ फेब्रुवारी १२९४)
१७७१ : जपानी सम्राट कोकाकु यांचा जन्म.
१८६१: रॉबर्ट बॉश जर्मन अभियंते आणि उद्योजक (मृत्यू: १२ मार्च १९४२)
१९०३ : युसूफ मेहेर अली समाजवादी नेते, स्वातंत्र्यसैनिक व मुंबईचे महापौर (मृत्यू: २ जुलै १९५०)
१९०८ : रामधारी सिंह 'दिनकर' देशभक्त व हिन्दी साहित्यिक (मृत्यू: २४ एप्रिल १९७४). भागलपूर विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली. केंद्रीय गृहमंत्रालयाचे ते हिंदी भाषाविषयक सल्लागार होते.
१९११ : भारतीय भौतिकशास्त्रज्ञ राप्पल संगमेश्वर कृष्णन यांचा जन्म. त्यांचे प्रमुख संशोधन प्रकाशाचे विखुरणे, वर्णपट विज्ञान, स्फटिकभौतिकी व अणुकेंद्रीय भौतिकी या शाखांतील आहे. त्यांनी एका नवीन प्रकाशकीय परिणामाचा शोध लावला व सैद्धांतिकरीत्या त्याचे व्यापक स्वरूप प्रस्थापित केले. या परिणामाला ''कृष्णन परिणाम' असे नाव प्राप्त झाले आहे.
१९१४ : ब्रुनेईचा राजा ओमर अली सैफुद्दीन (तिसरा) यांचा जन्म.
१९१५ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ क्लिफर्डशुल यांचा जन्म.
१९१७ : साली भारतीय सेंद्रिय रसायनशास्त्री असीमा चटर्जी यांचा जन्मदिन.
१९१९ : देवदत्त दाभोळकर पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, शिक्षणतज्ञ, गांधीवादी व समाजवादी (मृत्यू: १७ डिसेंबर २०१०). त्यांची ''अ पायलट सर्व्हे ऑफ शिरुर तालुका ऍग्रो इंडस्ट्रिअल बॅलन्स', ''क्लाईबिंग अ वॉल ऑफ ग्लास', ''सरदार सरोवर डिबेट', ''ओ नर्मदा' इ. अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत.
१९२० : प्रा. भालचंद्र वामन तथा 'भालबा' केळकर नाट्यकला, विज्ञान, अध्यात्म या सर्व क्षेत्रांत सारख्याच अधिकाराने वावरणारे सव्यसाची व्यक्तिमत्त्व, प्रोग्रेसिव्ह डेमॉटिक असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष, हौशी प्रायोगिक रंगभूमीचे अध्वर्यू, लेखक, अभिनेते, दिग्दर्शक (मृत्यू: ६ नोव्हेंबर १९८७).
१९३५ : साली प्रसिद्ध भारतीय हिंदी आणि पंजाबी चित्रपट अभिनेता प्रेम चोपडा यांचा जन्मदिन.
१९४३ : तनुजा चित्रपट अभिनेत्री
१९५० : गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात उल्लेखनीय वैद्यकीय सेवाकार्य करणारे डॉ. अभय बंग यांचा जन्म. त्यांना ''महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने गौरविण्यात आले.
१९५२ : अंशुमान गायकवाड क्रिकेटपटू
१९५७ : कूमार सानू पार्श्वगायक

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५८ : ग्रँट डफ मराठ्यांचा इतिहास लिहीणारा ब्रिटिश अधिकारी (जन्म: ८ जुलै १७८९)
१८६३ : साली ब्रिटीश कालीन भारतातील पहिल्या स्वातंत्र्य संग्रामाच्या वेळी हरियाणा येथील बंडाचे नेतृत्व करणारे महान क्रांतिकारक राव तुलाराम सिंह यांचे निधन.
१८७० : प्रॉस्पर मेरिमी फ्रेंच कथालेखक, नाटककार, इतिहासकार आणि पुरातत्त्वज्ञ (जन्म: २८ सप्टेंबर १८०३)
१८८२ : फ्रेडरिक वोहलर जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ३१ जुलै १८००)
१९३९ : सिग्मंड फ्रॉईड ऑस्ट्रियन मानसशास्त्रज्ञ, आधुनिक मानसशास्त्राचा जनक (जन्म: ६ मे १८५६)
१९६४ : भार्गवराम विठ्ठल तथा 'मामा' वरेरकर (जन्म: २७ एप्रिल १८८३). सत्तेचे गुलाम, करीन ती पूर्व, हाच मुलाचा बाप, संन्याशाचा संसार आदी नाटके त्यांनी लिहिली. रवींद्रनाथ टागोर, शरच्चंद्र चट्टोपाध्याय, जेम्स बॅरी, हेन्रिक इब्सेन, विल्यम बॅरेट यांच्या साहित्यकृतींचे मराठी अनुवाद त्यांनी केले. विधवाकुमारी, संसार की संन्यास, धावता धोटा या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांना सरकारने ''पद्मविभूषण' सन्मान प्रदान केला होता.
१९९९ : मराठी चित्रपट, जाहिरातपट निर्माते गिरीश घाणेकर यांचे निधन.
२००४ : डॉ. राजा रामण्णा शास्त्रज्ञ, अणुऊर्जा आयोगाचे ४ थे अध्यक्ष (जन्म: २८ जानेवारी १९२५)
२०१२ : कांतिलाल गिरीधारीलाल व्होरा ऊर्फ के. लाल जादूगार (जन्म:१९२४)
२०१५ : भारतीय संन्यासी आणि तत्त्वज्ञ दयानंद सरस्वती यांचे निधन. (जन्म: १५ ऑगस्ट १९३०)

पीक परिस्थितीच्या पाहणीसाठी मुख्यमंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर!

पिकांचे सरसकट नुकसान; मदतही सरसकट देणार– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

लातूर जिल्ह्यातील जाऊ आणि खरोसा येथे पिकांची पाहणी; शेतकऱ्यांशी संवाद

शेतकऱ्यांना थेट मदत देण्यासाठी गतीने पावले उचलण्यास सुरुवात

संकटकाळात शेतकऱ्यांना एकटे सोडणार नाही; शासन पूर्ण ताकदीने पाठीशी उभे राहणार

लातूर। प्रतिनिधी

मराठवाड्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यांत यावर्षी अतिशय कमी पाऊस पडला आहे. त्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. लातूर जिल्ह्यात सर्वात कमी म्हणजेच केवळ ५० टक्के पाऊस झाला असून, येथील नदी-नाले व विहिरी कोरड्या पडल्या आहेत. पावसाअभावी पिकांचे सरसकट नुकसान झाल्याचे दिसत असून, राज्य शासनही शेतकऱ्यांना सरसकट मदत करेल. या संकटकाळात शेतकऱ्यांना एकटे न सोडता शासन पूर्ण ताकदीने त्यांच्या पाठीशी उभे राहून आवश्यक ती सर्व मदत करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.पीक परिस्थितीच्या पाहणीसाठी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या दौऱ्याला लातूर येथून सुरुवात झाली. यावेळी त्यांनी लातूर जिल्ह्यातील जाऊ आणि खरोसा येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन खरीप पिकांच्या नुकसानीची पाहणी केली व शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. या प्रसंगी लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार बसवराज पाटील, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.





राज्यात यंदा दुष्काळाची भीषणता १९७२ पेक्षाही अधिक तीव्र राहण्याची शक्यता आहे. या बाबीचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य शासनाने गतीने पावले उचलली आहेत. लवकरच दुष्काळाबाबतची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट मदत जमा करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. शेतकऱ्यांचे सुमारे ४८ हजार कोटी रुपयांचे कृषिपंप वीज बिल यापूर्वीच माफ केले असून, यापुढेही त्यांना वीज बिल भरावे लागणार नाही. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना राबवून शेतकऱ्यांना शासनाने दिलासा दिला असून, या योजनेचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्याला मिळेपर्यंत तिची अंमलबजावणी सुरूच राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी पिण्याचे पाणी व जनावरांच्या चाऱ्याचे योग्य नियोजन करण्यात येईल. तसेच शेतकऱ्यांना अन्नधान्यासह आवश्यक ती सर्व मदत करण्यासाठी पावले उचलली जात आहेत. जलसंधारणाची आणि रोजगार निर्मितीची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येतील. या संकटात राज्य शासन पूर्ण ताकदीने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहील. पुढचे काही महिने अतिशय आव्हानात्मक असून या काळात धीर सोडू नका; संकटाचा सामना आपण सर्वजण एकजुटीने करूया, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. तसेच बंद असलेल्या पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर सुरू करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

निलंगा तालुक्यातील जाऊ येथे मुख्यमंत्र्यांना पीक नुकसानीची माहिती देताना नूर पटेल हे शेतकरी भावूक झाले. वाळलेली पिके पाहून त्यांना हुंदका अनावर झाला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी त्यांचा हात हातात घेऊन, ''घाबरू नका, राज्य शासन या संकटात पूर्णपणे तुमच्यासोबत आहे. सर्वतोपरी मदत केली जाईल, असा धीर देत दिलासा दिला. तसेच या ठिकाणी उपस्थित महिला शेतकऱ्यांशीही मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला.

पीआय आनंद कोकरे यांची नियंत्रण कक्षात बदली

पोलिसांच्या वर्दीत भक्षक बनू पाहणाऱ्या पुजारी व कोकरे यांना पो.अ.सुदर्शन यांनी शिकवला '' कायद्याचा धडा '' !

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांची दोन महिने व नऊ दिवसात तडकाफडकी अहिल्यानगर पोलीस नियंत्रण कक्षात बदली झाल्याने पाथर्डी पोलीस ठाण्याला पुन्हा एकदा नवीन पोलीस निरीक्षक कोण येणार याची उत्सुकता आहे तत्कालीन पोलीस निरीक्षक विलास पुजारी व तदनंतर पदभार स्वीकारलेले आनंद कोकरे यांची अल्प असलेली कारकीर्द अतिशय वादग्रस्त राहिली त्यांच्या कारकिर्दीत अवैधधंदे गुंडगिरी खोटे गुन्हे दाखल करण्याचे प्रमाण त्याचबरोबर निष्पाप तरुणांचे झालेले खून त्यांच्या मारेकऱ्यांना जेरबंद न करता लाखो रुपयांचे एजंट विनोदच्या माध्यमातून आर्थिक तोडजोड केली गेली दरोडे चोऱ्या लुटमार रोड रॉबरी अवैध बेकायदेशीर बनावट दारू विक्री वाळूमाफिया यांना अभय व महिन्याला लाखो रुपयांची आर्थिक उलाढाल करणारे अत्यंत भ्रष्ट पोलीस अधिकारी म्हणून विलास पुजारी व आनंद कोकरे यांनी पाथर्डीत मोहीम राबवली होती तसेच पोलीस अंमलदार विनोद मासाळकर याला लाचलुचपत प्रतिबंध विभागाने एक लक्ष रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी जेरबंद केल्याने पाथर्डी पोलिसांच्या इज्जतीचे धिंडवडे उडाल्याचे पाहायला मिळाले गोरगरीब जनतेला अन्याय सहन करण्याच्या पलीकडे असाह्य वेदना सर्वसामान्य जनतेला पाथर्डी पोलीस ठाण्यात वेठीस धरणाऱ्या व पोलिसांच्या खाकी वर्दीच्या आड़ून भक्षक बनवू पाहणाऱ्या पुजारी व कोकरे यांना नियतीने व वरिष्ठ जिल्हा पोलीस अधीक्षक ममुका सुदर्शन यांनी प्रशासकीय व कायद्याचा धडा शिकवल्याने पाथर्डी तालुक्यात गुंडाराज जंगलराज पोसू पाहू इच्छिणाऱ्या पाथर्डी पोलीस ठाण्यात आता मोकळा श्वास घेतला जावा यापुढे पाथर्डी पोलीस ठाण्याच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याच्या अपेक्षेने नवीन प्रशासकीय इमारतीतून पोलिसांकडून सदरक्षणाय खलनिग्रहणाय न्यायिक कामकाज करण्याच्या अपेक्षेने पाथर्डी पोलीस ठाण्यात नवीन दबंग पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची मागणी विविध सामाजिक संघटना व जनतेतून केली जात आहे.

कथित घोटाळेबाज ग्रामरोजगारसेवक शहादेव खेडकर याची चौकशी करण्याचे सीईओचे आदेश

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील एकनाथवाडी ग्रामपंचायत येथे कार्यरत असलेला ग्रामरोजगार सेवक शहादेव खेडकर याच्या प्रसारित झालेल्या ऑडियो क्लिप मूळे प्रचंड खळबळ उडाली आहे गायगोठा विहीर मंजुरी घरकुल घोटाळा अश्या अनेक योजनेतील गैरव्यवहार प्रकरणी शहादेव खेडकर यांच्यावर कारवाईची मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे ग्रामरोजगारसेवकाने आपल्या घरात ३ घरकुल मिळवले असून स्वतः चे पक्के घर असताना हे घरकुल प्रशासनाने मंजूर कसे केले तसेच शहादेव खेडकर याच्या वडिलांनी घरकुल योजनेतील हप्ता देखील मिळवला आहे ट्रैक्टर विहीर हे स्वतःच्याच घरातील व्यक्तींना लाभ मिळाला आहे याचे लागेबांधे पंचायत समिती पर्यंत येवून पोहचतात तसेच बक्षीस सोड चिठी योजना देखील शहादेव खेडकर याच्याच नावाने चिठी कशी निघते याची चौकशी करावी अशी मागणी जोर धरत आहे शहादेव खेडकर याच्या विरुद्ध महाराष्ट्र सरकार ग्रामीण विकास मंत्रालय पोर्टल वरती अनेक तक्रारी दाखल झाल्या असून स्वतःच्या घरात अनेक घरकूल व विविध बेकायदेशीर शासकीय लाभ मिळवल्यामुळे ३१६ अंतर्गत कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

ग्रामरोजगार सेवक शहादेव खेडकर याच्या चौकशीसाठी कमिटी नेमली असून कमिटीकडून निष्पक्ष चौकशी करण्यात येईल व शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी शहादेव खेडकर याच्यावर कारवाई करण्यात येईल तसेच एकनाथवाडी ग्रामपंचायत दप्तर तपासणीसाठी देखील आम्ही विशेष कमिटी स्थापन केली आसून आठ दिवसात अहवाल मागवला आहे.

आनंद भंडारी (सीईओ. जि.प.अहिल्यानगर)

ग्रामरोजगार सेवकाची तथाकथित कॉल रिकॉर्डिंग तपासण्याचे काम सुरू असून या रेकॉर्डिंगच्या माध्यमातून ग्रामरोजगार सेवक शहादेव खेडकर यावर शिस्तभंगाची व निलंबनाची कारवाई करण्याबरोबर त्याचे पंचायत समिती कार्यालयात कोणाशी आर्थिक हितसंबंध आहेत का याची चौकशी करून त्याच्या घरकुलाचा लाभ कुठल्या शासकीय नियमाच्या आधारे घेतला निष्पक्ष चौकशी केली जाणार आहे.

राजेंद्र धस (गटविकास अधिकारी पाथर्डी)

माडग्याळ मेंढीला स्वतंत्र राष्ट्रीय प्रजातीची मान्यता

मुंबई। प्रतिनिधी

माडग्याळ मेंढीला अधिकृत प्रजाती म्हणून मान्यता दिल्याबद्दल आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वाखालील धनगर समाजाच्या शिष्टमंडळाने पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचा मंत्रालयात सत्कार केला. माडग्याळ मेंढीला राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र आणि अधिकृत प्रजाती म्हणून मिळालेल्या मान्यतेमुळे तिचे संवर्धन, जतन आणि आनुवंशिक सुधारणा कार्यक्रमांना मोठी चालना मिळेल, असा विश्वास मंत्री पंकजाताई मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध उमरडा गाईला स्वतंत्र देशी गोवंश म्हणून, तर माडग्याळ मेंढीला स्वतंत्र अधिकृत प्रजाती म्हणून भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरोने नोंदणी दिली आहे. या निर्णयाबद्दल जत तालुक्यातील धनगर समाजाच्या शिष्टमंडळाने मंत्री पंकजाताई मुंडे यांचा गोधडी, काठी व माडग्याळ मेंढीची प्रतिकृती देऊन सत्कार केला. माडग्याळ मेंढीला मिळालेली मान्यता ही जत परिसरातील पशुपालकांसाठी अभिमानाची बाब असल्याचे मंत्री पंकजाताई मुंडे यांनी नमूद केले.धनगर आणि रामोशी समाजातील मेंढपाळ तसेच शेतकरी माडग्याळ मेंढ्यांचे पालन करतात. विषम हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता, उत्तम रोगप्रतिकारशक्ती, जलद वजनवाढ, कोकरांच्या जगण्याचे अधिक प्रमाण, चांगली मातृत्व प्रवृत्ती आणि मांस उत्पादनासाठी उपयुक्तता या वैशिष्ट्यांमुळे ही मेंढी लोकप्रिय होत आहे. सांगली जिल्ह्यातील माडग्याळ आणि सनमाडी गावांतील स्थानिक मेंढीपालकांनी सुमारे १०० वर्षांपूर्वी निवड पैदास पद्धतीने या मेंढीची पैदास केली. माडग्याळ ही महाराष्ट्रातील मोठ्या आकाराची आणि मांस उत्पादनासाठी विशेष लोकप्रिय मेंढी आहे. या मेंढ्या प्रामुख्याने पांढऱ्या रंगाच्या असून त्यांच्यावर तपकिरी ठिपके आढळतात; काही मेंढ्या पूर्णपणे तपकिरी रंगाच्याही असतात.

थायलंडच्या अष्टधातू बुद्धमूर्तीने सजणार कन्हेरवाडीचे बुद्ध विहार; २७ सप्टेंबरला सोहळा

बीड। प्रतिनिधी

परळी तालुक्यातील कन्हेरवाडी येथील सम्राट अशोक बुद्ध विहारात थायलंडहून आणण्यात आलेल्या साडेतीन फूट उंचीच्या आणि सुमारे पंचवीस किलो वजनाच्या अष्टधातू बुद्धमूर्तीची रविवार, २७ सप्टेंबर रोजी भव्य प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी सुरू असून, प्रतिष्ठापनेपूर्वी मंगल वाद्यांच्या गजरात बुद्धमूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.आयु. लक्ष्मणराव रोडे दादा यांच्या वाढदिवसानिमित्त लक्ष्मणराव रोडे गुरुजी प्रतिष्ठान व समस्त रोडे परिवाराच्या वतीने या बुद्धरूप दान व प्रतिष्ठापना सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. थायलंडहून थेट कन्हेरवाडीत आणण्यात आलेली देखणी अष्टधातू बुद्धमूर्ती या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. मिरवणुकीनंतर भिक्खू संघाच्या उपस्थितीत बुद्धमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे.या मंगल प्रसंगी अखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्यकारी अध्यक्ष पूज्य भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो (पूर्णा), 'दि ग्रेट हॅपीनेस' युट्यूब चॅनेलचे संचालक पूज्य भदंत करुणानंद महाथेरो (छत्रपती संभाजीनगर), पूज्य भदंत पय्यातीस्स महाथेरो (सिरसाळा) तसेच प्रियदर्शी धम्म संस्कार संस्थेचे सचिव पूज्य भदंत धम्मशील थेरो (बीड) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

गेवराई नगरपरिषद

शास्त्री चौक, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड
नगर परिषद जेवराई
ईमेल:- .mcgeorai@gmail.com
फोन क्रमांक : ०२४४७-२६२०१५
जा.क्र/GMC/कर.वि/३५७७७०९/५/२०२६
दिनांक-निम्नस्वाक्षरीत

ई निविदा सूचना (दुसरी वेळ) क्रमांक (१) कर विभाग २०२६-२७

गेवराई नगरपरिषद हद्दीतील सर्व इमारती, खुले भूखंड व इतर मालमत्तांचे प्रत्यक्ष स्थळावर जाऊन सर्वेक्षण व मोजमाप करून, मालमत्ता क्रमांक, PTR क्रमांक, जुना PTR क्रमांक, कर आकारणी क्रमांक, सर्वे/गट क्रमांक, प्लॉट क्रमांक इत्यादींची सांगड घालणे; उपलब्ध खरेदीखत, ७/१२ उतारा, फेरफार नोंदी, PTR नोंद, जुना PTR, विद्यमान कर आकारणी, मंजूर अभिन्यास व गुंठेवारी संदर्भाची पडताळणी करणे; मालमत्तेची चतुःसीमा, भूखंडाचे क्षेत्रफळ, करयोग्य क्षेत्रफळ, प्रत्यक्ष बांधकामाचे क्षेत्रफळ, बांधकाम परवानगीनुसार मंजूर बांधकामाचे क्षेत्रफळ व अनधिकृत बांधकामाचे क्षेत्रफळ निश्चित करणे; मालमत्तेचा वापर व सद्यस्थिती नोंदविणे; नवीन मालमत्तांची नोंद व कर मागणी तयार करणे, विद्यमान कर आकारणीमध्ये आवश्यक सुधारणा व पुनर्मूल्यांकनास सहाय्य करणे; आवश्यकतेनुसार मालमत्तांचे छायाचित्रण, GPS/GIS व इतर डिजिटल माहिती संकलित करणे; सर्व माहिती नगरपरिषदेच्या संबंधित संगणकीय प्रणालीमध्ये अद्ययावत करून अंतिम मालमत्ता डेटाबेस तयार करणे व आवश्यक अहवाल, प्रिंट, स्टेशनरी व बाईंडिंगसह नगरपरिषदेकडे सुपूर्द करणे, तसेच सदर कामाशी संबंधित इतर सर्व अनुषंगिक कामे करणे

या करीता कंत्राटदार/संस्था यांच्याकडून बी वन(B1) (१) नमुन्यात खालील कामासाठी ई निविदा मागविण्यात येत आहे. कंत्राटदार/संस्था यांनी दिनांक २४/०९/२०२६ वेळ १७:०० वाजेपर्यंत ई-निविदा भराव्यात सविस्तर माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २४/०९/२०२६ रोजी १०:०० वाजेपासून दिनांक ०५/१०/२०२६ रोजी १७:०० वाजेपर्यंत पाहता व डाऊनलोड करता येईल व भरता येतील. याची इच्छूक कंत्राटदार/संस्था यांनी नोंद घ्यावी.

-स्वाक्षरीत-
(विक्रम पुष्पा मारुती मांडुरके)
मुख्याधिकारी नगरपरिषद गेवराई

पदवीधर मतदारसंघ निवडणुकीत आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करा- विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण व नियमबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासनाने सर्व आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिल्या.औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूक कार्यक्रमाच्या अनुषंगाने मान्यताप्राप्त राष्ट्रीय व राज्यस्तरीय राजकीय पक्षांच्या विभागस्तरीय अध्यक्ष व सचिवांची बैठक विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस सह आयुक्त मंजुषा मिसकर तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.



बैठकीत निवडणूक कार्यक्रम, मतदान प्रक्रिया, मतदार यादी, आदर्श आचारसंहितेचे पालन, उमेदवारी अर्ज आणि प्रशासकीय तयारी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. श्री. श्रीकांत म्हणाले, आचारसंहितेच्या कालावधीत सभा व इतर कार्यक्रमांसाठी आवश्यक परवानग्या देताना प्रशासन व राजकीय पक्षांमध्ये योग्य समन्वय ठेवावा. उमेदवार व राजकीय पक्षांची गैरसोय होऊ नये, यासाठी एक खिडकी पद्धतीने परवानगी प्रक्रिया राबवावी. मतदारांची नावे चुकीच्या ठिकाणी नोंदवली जाणे किंवा वगळली जाणे यांसारख्या तक्रारींची गंभीर दखल घेऊन त्वावर पारदर्शकपणे कार्यवाही करावी. निवडणूक प्रक्रियेतील सर्व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. या निवडणुकीत उमेदवारांना निवडणूक चिन्ह दिले जाणार नसून पसंतीक्रम मतदान पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. मतदानासाठी मतपत्रिकेचा वापर केला जाणार आहे. राजकीय पक्ष व उमेदवारांची माहिती मतदारांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रशासन व राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये तातडीने माहितीची देवाणघेवाण व समन्वय साधण्यासाठी व्हॉट्सॲप समूहाचा वापर केला जाणार आहे. भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार निवडणुकीची अधिसूचना २९ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत ०६ ऑक्टोबर २०२६, अर्जांची छाननी ०७ ऑक्टोबर रोजी, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ०९ ऑक्टोबर आहे. प्रत्यक्ष मतदान २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ०८ ते सायंकाळी ०४ या वेळेत होणार असून, मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी होणार आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६ पूर्वी पूर्ण केली जाणार आहे. मतदारसंघासाठी मतदार यादी तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, पात्र मतदारांनी मतदार यादीत आपले नाव असल्याची खात्री करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. पदवीधर मतदारसंघासाठी मतदार याद्यांच्या अद्ययावतीकरणाची प्रक्रिया मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत राबविण्यात आली आहे, असेही विभागीय आयुक्तांनी सांगितले. निवडणूक प्रक्रियेशी संबंधित प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून मतदारांना कोणतीही अडचण येणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

दैनिक
राज्य लोकतंत्र
गुरूवार दि.२४ सप्टेंबर २०२६ | ६

बीड तालुक्यात तब्बल १५ क्रशर सील

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा दणका; तहसीलदार शेळके यांची थेट कारवाई

बीड । प्रतिनिधी

बीड मंडळातील गौण खनिज उत्खनन , साठवणूक व त्यावर आधारित व्यवसायांमध्ये नियमांचे पालन व्हावे , शासनाच्या महसुलाचे संरक्षण व्हावे आणि अनधिकृत अथवा नियमबाह्य व्यवसायांवर प्रभावी नियंत्रण राहावे , या उद्देशाने बीड तालुक्यात महसूल विभागाने धडक कारवाई सुरू केली आहे . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या विशेष प्रयत्नांतून सुरू असलेल्या या मोहिमेला आता वेग आला असून , बीड तालुक्यातील तब्बल १५ क्रशर सील करण्यात आले आहेत . यामध्ये बीड मंडळातील ६ , तर पाली मंडळातील तब्बल ९ क्रशरचा समावेश आहे . तसेच संबंधित परिसरातील वीटभट्टीधारकांनाही नोटिसा बजावण्यात आल्या आहेत .

जिल्ह्यात गौण खनिजाशी संबंधित कामकाजात नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून सातत्याने पाहणी आणि तपासणी करण्यात येत आहे . या पार्श्वभूमीवर बीड तालुक्यातील विविध भागांत क्रशर तसेच वीटभट्ट्यांची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले . त्यानुसार बीड तहसील कार्यालयाच्या महसूल यंत्रणेने प्रत्यक्ष क्षेत्रात उतरून कारवाई केली . प्रशासनाच्या या धडक मोहिमेमुळे नियमांचे पालन न करणाऱ्या संबंधित व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे .

बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात महसूल प्रशासनाच्या कामकाजाला अधिक गतिमान करण्यावर भर देण्यात येत आहे . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक आणि निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी गौण खनिजाशी संबंधित व्यवहारांमध्ये शासनाच्या नियमांचे पालन , परवानग्यांची पूर्तता , महसूल वसुली आणि प्रशासनाच्या आदेशांची अंमलबजावणी या बाबींवर लक्ष ठेवण्याच्या अनुषंगाने महसूल यंत्रणेला आवश्यक त्या सूचना दिल्या . त्याच अनुषंगाने बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके नायब तहसीलदार सुहास हजारे , प्रशांत जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी यांनी प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन पाहणी सुरू केली .

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली बीड मंडळात महसूल विभागाने कारवाईची धडक मोहीम राबवली . बीडचे मंडळ अधिकारी अनिल तांदळे आणि ग्राम महसूल अधिकारी सचिन एरंडे यांनी संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून बीड मंडळातील ६ क्रशर सील केले . क्रशर परिसरात प्रत्यक्ष जाऊन तेथील यंत्रसामग्री , साठवणूक परिसर आणि संबंधित कामकाजाची पाहणी करण्यात आली . प्रशासनाच्या निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली असून , नियमांची पूर्तता आणि संबंधित कागदपत्रांची तपासणी याबाबतही महसूल यंत्रणेकडून कार्यवाही केली जात आहे.क्रशर उद्योग हा गौण खनिजाशी थेट संबंधित असल्याने या व्यवसायाच्या माध्यमातून होणाऱ्या खनिज हाताळणीवर प्रशासनाचे लक्ष असते . त्यामुळे संबंधितांनी शासनाने निश्चित केलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे . याच पार्श्वभूमीवर बीड मंडळातील सहा क्रशरवर सीलची कारवाई करण्यात आली .





बीड तालुक्यातील पाली मंडळातही महसूल विभागाने मोठी कारवाई केली . पालीच्या मंडळ अधिकारी शितल चाटे यांच्या नेतृत्वाखाली तब्बल ९ क्रशर सील करण्यात आले . या कारवाईवेळी ग्राम महसूल अधिकारी राजाभाऊ गायकवाड तसेच इतर महसूल कर्मचारी उपस्थित होते . पाली परिसरातील संबंधित क्रशरची प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासनाच्या निर्देशानुसार कारवाई करण्यात आली . महसूल पथकाने क्षेत्रावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली . आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करून संबंधित क्रशर सील करण्यात आले .

बीड मंडळातील ६ आणि पाली मंडळातील ९ अशा एकूण १५ क्रशरवर झालेल्या कारवाईमुळे बीड तालुक्यात महसूल विभागाने गौण खनिज व्यवसायाकडे गांभीर्याने लक्ष दिल्याचे स्पष्ट झाले आहे .

वीटभट्टीधारकांनाही नोटिसा : क्रशरबरोबरच वीटभट्ट्यांच्या कामकाजाकडेही महसूल विभागाने लक्ष केंद्रित केले आहे . बीड मंडळातील संबंधित भागात पाहणीदरम्यान वीटभट्टीधारकांनाही नोटिसा बजावण्यात आल्या आहेत . संबंधित वीटभट्टीधारकांनी आवश्यक कागदपत्रे , परवानग्या आणि शासनाच्या नियमांनुसार आवश्यक बाबींची पूर्तता करावी , या अनुषंगाने प्रशासनाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे .

महसूल विभागाकडून सुरू असलेल्या या मोहिमेत केवळ कारवाई करणे एवढाच उद्देश नसून , गौण खनिजाशी संबंधित व्यवसाय शासनाच्या नियमांच्या चौकटीत चालावेत , शासनाचा महसूल सुरक्षित राहावा आणि अनधिकृत उत्खनन अथवा नियमबाह्य हाताळणीला आळा बसावा , हा व्यापक प्रशासकीय उद्देश असल्याचे महसूल यंत्रणेच्या कार्यवाहीतून दिसून येत आहे .

तहसीलदार चंद्रकांत शेळके , नायब तहसीलदार प्रशांत जाधवर आणि नायब तहसीलदार सुहास हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्रीय यंत्रणा सक्रिय : बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाची क्षेत्रीय यंत्रणा अधिक सक्रिय करण्यात आली आहे . मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी यांना आपल्या कार्यक्षेत्रातील गौण खनिजाशी संबंधित बाबींवर लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत . त्यानुसार अधिकारी आणि कर्मचारी प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन पाहणी करीत आहेत .

बीड मंडळ अधिकारी अनिल तांदळे , ग्राम महसूल अधिकारी सचिन एरंडे यांनी बीड मंडळात प्रत्यक्ष कारवाई केली . तर पाली मंडळ अधिकारी शितल चाटे , ग्राम महसूल अधिकारी राजाभाऊ गायकवाड आणि इतर कर्मचाऱ्यांनी पाली मंडळातील कारवाईत सहभाग घेतला . अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष ठिकाणी उपस्थित राहून कारवाई करीत असल्याने महसूल विभागाच्या मोहिमेला क्षेत्रीय पातळीवर गती मिळाली आहे .

गौण खनिज उत्खनन , वाहतूक , साठवणूक तसेच क्रशर आणि वीटभट्टी व्यवसायाशी संबंधित सर्व व्यावसायिकांनी शासनाच्या प्रचलित नियमांचे काटेकोरपणे पालन करावे , आवश्यक त्या परवानग्या व कागदपत्रांची पूर्तता करावी आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे , असे आवाहन महसूल प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे . परवानग्या आणि नियमांची पूर्तता न करता व्यवसाय सुरू ठेवणे अथवा प्रशासनाच्या सूचनांकडे दुर्लक्ष करणे टाळावे . महसूल विभागाकडून भविष्यातही संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करण्यात येणार असून , तपासणीदरम्यान आढळून येणाऱ्या बाबींनुसार नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.बीड तालुक्यात एकाच मोहिमेत १५ क्रशर सील झाल्याने गौण खनिजाशी संबंधित व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे . प्रशासनाकडून आता केवळ कागदोपत्री तपासणी न करता प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन पाहणी करण्यात येत असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे . क्रशर , वीटभट्टी आणि गौण खनिजाशी संबंधित इतर बाबींवरही महसूल यंत्रणेची नजर राहणार असल्याने संबंधित व्यावसायिकांनी नियमांची पूर्तता करण्याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक झाले आहे .

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या विशेष प्रयत्नांतून महसूल यंत्रणेच्या क्षेत्रीय कामकाजाला मिळालेली गती या कारवाईतून अधोरेखित झाली आहे . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी यांनी प्रत्यक्ष क्षेत्रात उतरून केलेल्या कारवाईमुळे प्रशासनाच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.बीड तालुक्यातील विविध भागांमध्ये क्रशर , वीटभट्ट्या आणि गौण खनिजाशी

पान ३ वर

सात गावठी हातभट्टी दारू अड्ड्यांसह जुगार अड्ड्यावर छापा; ४.१८ लाखांचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांच्या अवैध धंद्यांवर कारवाई करण्याच्या आदेशानुसार गेवराई पोलिसांनी मोठी धडक मोहीम राबवली आहे. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी तुकानाईक तांडा, आंबुनाईक तांडा आणि हरिलाल नाईक तांडा या भागातील ७ गावठी हातभट्टी दारू अड्ड्यांवर तसेच ताकडगाव येथील एका जुगार अड्ड्यावर धाड टाकून तब्बल ४ लाख १८



हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मिळालेल्या माहितीनुसार, गेवराई तालुक्यातील तुकानाईक तांडा, आंबुनाईक तांडा व हरिलाल नाईक तांडा या ठिकाणी गावठी हातभट्टीची दारू तयार केली जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी विविध ७ ठिकाणी छापे टाकून दारू तयार करण्यासाठी लागणारे रसायन आणि साहित्य असा एकूण ९६,३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून जागेवरच नष्ट केला. याप्रकरणी दारू तयार व विक्री करणाऱ्या पापा जनार्धन चव्हाण, संकेत वसंत राठोड, बाबु हाचु राठोड, संजय श्रीराम जाधव, विकास

पान ३ वर

राज्यात त्वरित कोरडा दुष्काळ जाहीर केला नाही तर अ.भा. छावा तीव्र आंदोलन करणार –रोमन

बीड । प्रतिनिधी

यावर्षी बीड जिल्हा, मराठवाडयासह संपूर्ण राज्यात पावसाअभावी खरीप हंगामातील सर्व पिकांचे १०० टक्के नुकसान झाले आहे. शेतकरी पूर्णपणे उध्दवस्त झाला आहे. पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या चा-याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

या गंभीर प्रश्नाकडे महाराष्ट्र सरकारने त्वरित लक्ष द्यावे याकरिता अखिल भारतीय छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मा. विजयकुमार घाडगे पाटील हे तावशी ताड ता. औसा, जि. लातूर येथे आमरण उपोषणास बसले आहेत.

त्यांच्या उपोषणाची शासनाने



तात्काळ दखल घ्यावी व या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन राज्यात त्वरित कोरडा दुष्काळ जाहीर करावा याकरिता अ. भा. छावाचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा रोमन यांच्या नेतृत्वाखाली अ.भा. छावाच्या वतीने बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन घेऊन राज्यात त्वरित कोरडा दुष्काळ जाहीर करावा आणि आमच्या खालील मागण्या त्वरित मान्य कराव्यात असे निवेदन अ. भा. छावाचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा रोमन यांनी जिल्हाधिकारी बीड यांना दिले आहे

या निवेदनात अखिल भारतीय छावाच्या खालील प्रमुख मागण्या आहेत

प्रमुख मागण्या :

मराठवाडयासह राज्यात तात्काळ कोरडा दुष्काळ जहीर करावा, खरीप हंगामातील सर्व पिकांचे १०० टक्के नुकसान झाले असल्याने शेतक-यांना प्रति हेक्टरी १ लाख रुपये अनुदान तात्काळ देण्यात यावे, सन २०२४-२५ व २०२५-२६ या दोन्ही वर्षाचा पीक विमा तात्काळ शेतक-यांच्या खात्यात वितरीत करावा, नियमित कर्जफेड करणा-या शेतक-यांना १ लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्यात यावे, राज्यासह मराठवाडयात जनावरांसाठी पाणी व चा-याची टंचाई दूर करण्यासाठी तात्काळ चारा छावण्या सुरु कराव्यात.

पान ३ वर

आष्टी मतदारसंघाच्या विकासाला नवी प्रशासकीय गती; कडा येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना महसूल व प्रशासकीय सेवा अधिक सुलभ, गतिमान आणि त्यांच्या जवळच्या ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आ.सुरेश धस यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. कडा येथे अपर तहसील कार्यालय मंजूर करण्यात आले असून, त्यामुळे परिसरातील नागरिकांना महसूल व प्रशासकीय कामांसाठी आष्टी तहसील कार्यालयाच्या ठिकाणी वारंवार ये-जा करण्याची गरज कमी होणार आहे.

कडा व परिसरातील नागरिकांच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण प्रशासकीय निर्णय मानला जात आहे. विविध महसूल विषयक कामे, दाखले, प्रशासकीय प्रक्रिया तसेच शासनाच्या विविध योजनांशी संबंधित कामकाज अधिक सुलभ आणि जलदगतीने होण्यास या कार्यालयाची मदत होणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना प्रशासन त्यांच्या अधिक जवळ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

कडा येथे अपर तहसील कार्यालय मंजूर व्हावे, यासाठी आ. सुरेश धस यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला.याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार तसेच महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांचे आ.धस यांनी आभार मानले.

या निर्णयामुळे आष्टी मतदारसंघातील प्रशासकीय यंत्रणेला नवी गती मिळण्यासोबतच कडा परिसरातील नागरिकांना महसूल सेवा अधिक सुलभपणे उपलब्ध होणार आहेत. नागरिकांना शासकीय सेवा त्यांच्या जवळ आणि वेळेत मिळाव्यात, हा विकासाचा केंद्रबिंदू आहे. कडा येथे अपर तहसील कार्यालय मंजूर होणे हे त्याच दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे, अशी भावना आ. सुरेश धस यांनी व्यक्त केली.

राजस्थान माध्यमिक विद्यालयाचा क्रिकेट संघ तालुकास्तरीय स्पर्धेत विजयी



माजलगाव । प्रतिनिधी

तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा २०२६-२७ अंतर्गत घेण्यात आलेल्या १७ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत राजस्थान माध्यमिक विद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत दैदिप्यमान यश संपादन केले. या विजयामुळे विद्यालयाचा संघ आता जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

या विजयी संघात सार्थक श्यामसुंदर शर्मा, दिपराज दीपक सटाले,

पान ३ वर

विलास इचके यांची धावण्यातील विक्रमी झेप

सातारा हिलनंतर शौर्य मॅरेथॉनमध्येही विलास इचके यांची दमदार कामगिरी; पोलिसांकडून कौतुक

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील धावपटू व ग्रामीण पोलीस ठाणे या ठिकाणी कार्यरत असलेले विलास इचके यांनी सलग दोन मॅरेथॉन स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत आपल्या धावण्याच्या क्षेत्रातील सातत्य सिद्ध केले आहे. त्यांच्या या कामगिरीची दखल घेत माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामोड , सहायक पोलीस निरीक्षक अंभोरे , सहायक पोलीस निरीक्षक ओगले तसेच इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

इचके यांनी ६ सप्टेंबर रोजी महाराष्ट्रातील अत्यंत आव्हानात्मक समजल्या जाणाऱ्या सातारा हिल हाफ मॅरेथॉन स्पर्धेत २ तास १२ मिनिटांत शर्यत पूर्ण केली. अवघड चढ-उतार आणि आव्हानात्मक मार्गावर त्यांनी ही शर्यत पूर्ण केली. त्यानंतर २० सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे भारतीय सैन्याच्या सहकार्याने आयोजित 'शौर्य मॅरेथॉन – हंगाम २'मध्ये



२१ किलोमीटरचे अंतर १ तास ५७ मिनिटे

पान ३ वर

संशयित तांदूळ प्रकरणी पाच दिवसानंतर महसूलला पत्र, नेकनूर पोलिसांची तत्परता

बीड । प्रतिनिधी

पाच दिवसापूर्वी मांजरसुंबा परिसरात मांजरसुंबा-पाटोदा रस्त्यावर तांदळाचा एक ट्रक पलटी झाला होता. हा ट्रक पोलिसांनी नेकनूर पोलीस ठाण्यात नेऊन लावला. यादरम्यान त्यांनी गाडीचा चालक आणि मालकालाही निरोप पाठवले. मात्र त्यांनी पोलीस ठाण्यात यायची तसदी घेतली नाही. त्यानंतर पोलिसांनी पाच दिवसानंतर तहसील कार्यालयाला पत्र देऊन हा तांदूळ नेमका कुठला? याची विचारणा केली हेच पत्र पहिल्याच दिवशी दिले असते तर आतापर्यंत याची चौकशी झाली असती. मात्र नेकनूर पोलिसांना याचे गांभीर्य नसल्याचे स्पष्ट होत आहे.

बीड तालुक्यातील पाटोदा- मांजर सुंबा रस्त्यावर मांजरसुंबाकडे येणारा ट्रक चालकाच्या चुकीमुळे पलटी झाला. या ट्रकमध्ये तांदूळ असल्याचे लक्षात आल्यानंतर परिसरातील काही नागरिकांनी नेकनूर पोलिसांना कळवले. दरम्यानच्या काळात या ठिकाणी एक गाडी आली आणि चालकाला ते घेऊन गेले. त्यानंतर पोलिसांनी हा ट्रक पोलीस ठाण्यात नेऊन लावला. या गाडीच्या मालक व चालकाला चौकशीसाठी निरोप पाठवले. मात्र या गाडीचा मालक आणि चालकाने पोलिसांना दाद दिली नाही. याची पाच दिवस वाट पाहिल्यानंतर नेकनूर पोलिसांनी महसूल विभागाला पत्र देऊन हा तांदूळ नेमका कुठला याची चौकशी करण्याची विनंती केलेली आहे. हे पत्र जर पहिल्याच दिवशी महसूल विभागाला दिले असते तर आतापर्यंत त्याची चौकशी झाली असती. मात्र पोलिसांना याचे गांभीर असल्याचे दिसत नाही. पाच दिवसानंतर आता पत्र दिले त्यानंतर याची चौकशी कधी होणार आणि अहवाल कधी येणार तोपर्यंत प्रकरण रफादफा होते की काय? असा संशय परिसरातील नागरिकांना येत आहे. या प्रकरणात पोलिसांची भूमिका संशयास्पद असल्याचे दिसत आहे.

बीड पुणे जलद रेल्वे सेवेला रायमोहा येथे ग्रामीण थांबा देण्यात यावा

पाटोदा व शिरूर तालुक्यातील प्रवाशांची मागणी-जालिंदर सानप

रायमोहा । प्रतिनिधी

लोकनेते, केंद्रीय मंत्री स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या धाडसी भूमिकेमुळे आणि लोक नेत्या राज्याच्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी सातत्याने केंद्रीय रेल्वे बोर्डाकडे पाठपुरावा करून या मार्गाच्या कामाला गती दिली .तत्कालीन खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे यांच्या अथक परिश्रमामुळे वेळोवेळी भरीव निधी प्राप्त झाला .अहमदनगर बीड परळी रेल्वेचे स्वप्न साकार झाले परंतु या रेल्वे सेवेचा फायदा अधिकाधिक ग्रामीण जनतेला मिळवून देण्याऐवजी केंद्रीय रेल्वे बोर्ड गैरसोयीचे थांबे निर्धारितकरून ग्रामीण प्रवाशांना या सेवेपासून वंचित ठेवत आहे.अहिल्यानगर बीड परळी या रेल्वेमार्गावरील



बीड पुणे जलद रेल्वे सेवेला शिरूर व पाटोदा तालुक्यातील केंद्रस्थानी असणाऱ्या रायमोहा येथे प्रवासी थांबा देण्यात यावा अशी मागणी पाटोदा व शिरूर तालुक्यातील बहुसंख्य गावच्या प्रवाशांची आहे. प्रवाशांच्या या रास्त मागणीचा विचार करून रायमोहा येथे प्रथम ग्रामीण थांबा देण्यात यावा अशी मागणी शिरूर कासार तालुका पंचायत समितीचे पूर्व उपसभापती जालिंदर सानप यांनी रेल्वे बोर्डाकडे केली आहे.

या संदर्भात केंद्रीय रेल्वे बोर्डाला दिलेल्या निवेदनात रायमोहा येथील युवा नेते तथा शिरूर पंचायत समितीचे उपसभापती जालिंदर सानप यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्राचे लोकनेते तथा केंद्रीय मंत्री स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांनी आपल्या धाडसी व आक्रमक भूमिकेमुळे केंद्र सरकारकडून भरगच्च निधी प्राप्त केला व अहमदनगर बीड परळी रेल्वेचे काम गतिमान केले त्यांच्या पश्चात राज्याच्या मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. तत्कालीन बीड जिल्ह्याच्या खासदार डॉ. प्रीतम ताई मुंडे यांनी सातत्याने केंद्रीय रेल्वे बोर्डाकडे पाठपुरावा करून या मार्गाच्या कामाला गती दिली. यामुळे नगर बीड परळी रेल्वेचे स्वप्न गतीने साकार झाले याचा आनंद जिल्हा अवशियांना आहेच. नुकत्याच सुरू झालेल्या बीड पुणे या जलद गती रेल्वे सेवेला रायमोहा हे गाव पाटोदा आणि शिरूर कासार या दोन तालुक्यांतील प्रवाशांना जोडणारे गाव असल्यामुळे प्रवाशांच्या सोयीचा थांबा भौगोलिक परिस्थिती नुसार रायमोहा येथे देणे आवश्यक आहे. केंद्रीय रेल्वे

पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26